सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. २७ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ८५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आपल्या भाषा भारताला एकजूट करण्यासाठी सशक्त पर्याय बनतील - अमित शाह

### हिंदी सर्व भारतीय भाषांची सखी!

नवी दिल्ली, २६ जून - हिंदी भाषा कुठल्याही भारतीय भाषेची शत्रू नाही. हिंदी सर्व भारतीय भाषांची सखी आहे. हिंदी आणि इतर भारतीय भाषा मिळून आपल्या स्वाभिमान कार्यक्रमाला अंतिम लक्ष्यापर्यंत पोहोचवू शकतात. मागील काही दशकांपासून भाषेचा वापर भारतात विभागणी करण्यासाठी होत आहे. ते भारताला तोडू शकत नाहीत पण प्रयत्न करत आहेत. आपल्या भाषा भारताला एकजूट करण्यासाठी सशक्त पर्याय बनतील, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. गुरुवारी नवी दिल्लीत राजभाषा विभागाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्र, हिंदी सक्तीच्या विरोधात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर शाह यांनी उपरोक्त भाष्य केले.

शाह पुढे म्हणाले की, भारतीय भाषा जिवंत ठेवणे आणि त्यांना समृद्ध करणे



महत्वाचे आहे. येणाऱ्या काळात आपण सर्व भारतीय भाषांसाठी, विशेषतः अधिकृत भाषेसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती राष्ट्राचा आत्मा आहे. प्रत्येकाने गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त झाले पाहिजे आणि जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला त्याच्या भाषेचा अभिमान वाटत नाही किंवा तो स्वतःच्या भाषेत आपले विचार व्यक्त करत नाही, तोपर्यंत ती व्यक्ती गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होऊ शकत नाही. देशात जेईई, नीटच्या परीक्षा एकूण तीन भाषांमध्ये होत आहेत. याआधी सीआरपीएफ कॉन्स्टेबल भरतीसाठी लोकांकडे हिंदी आणि इंग्रजीचा पर्याय होता. केवळ या दोन भाषांतच अर्ज भरू शकत होते, मात्र आम्ही त्यात अन्य १३ भाषांमध्ये परीक्षा देण्याची परवानगी दिली. देशातील ९५ टक्के उमेदवार आज त्यांच्या मातृभाषेत परीक्षा देत आहेत. येणाऱ्या काळात भारतीय भाषांचे भविष्य उज्ज्वल आहे. मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही अधिकाधिक भाषा विभागावर काम करत आहोत. २०४७ मध्ये महान भारत विकसित होईल. यात भारतीय भाषांचा विकास, समृद्धतेसाठी त्याचा वापर वाढेल. त्याशिवाय सरकारी कामकाजात भारतीय भाषांचा वापर जास्तीत जास्त व्हायला हवा. हे काम केवळ केंद्र सरकारच नाही तर राज्य सरकारनेही करायला हवे. त्यासाठी आम्ही सर्व राज्यांच्या संपर्कात आहोत. त्यांना समजावून तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत, असेही शाह म्हणाले.

## चकमकीत २ महिला नक्षलवादी ठार

रायपूर, २६ जून : छत्तीसगडमधील अबुझमाडच्या जंगलात आज, गुरुवारी झालेल्या चकमकीत २ महिला नक्षलवादी ठार झाल्याची माहिती पुढे आली आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार, सुरक्षा दल अबुझमाडच्या घनदाट जंगलात नक्षलवाद्यांविरोधात विशेष मोहीम राबवत आहे. याच मोहिमेदरम्यान, जवानांचा नक्षलवाद्यांशी सामना झाला आणि दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार सुरू झाला. चकमकीनंतर परिसरात राबवण्यात आलेल्या शोधमोहिमेदरम्यान २ महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह जवानांच्या हाती लागले. घटनास्थळाची पाहणी केली असता, मृतदेहांजवळून एक रायफल, काही इतर शस्त्रे, वैद्यकीय साहित्य आणि दैनंदिन वापराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

## हिंदी भाषा सक्ती - उद्धव ठाकरेंकडून २९ जूनला जाहीर सभा, ७ जुलैला मोर्चाची हाक

मुंबई, २६ जून - मराठीशिवाय कोणतीही भाषा आम्ही लादून घेणार नाही. सरकारने हिंदी भाषा सक्ती थांबवावी. ही अघोषित हुकूमशाही आणि भाषिक आणीबाणी आहे. आम्ही २९ जूनला जाहीर सभा घेणार असून, या सभेत सरकारच्या निर्णयाची होळी केली जाईल. तसेच ७ जुलैला मोर्चा काढण्यात येणार आहे. पक्षीय भेद विसरून सर्व मराठी माणसांनी एकत्र यावं. मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार, साहित्यिक, खेळाडू - सगळ्यांनी मराठीसाठी पुढं यावं, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

राज्य सरकारच्या शालेय अभ्यासक्रमातील हिंदी भाषेच्या सक्ती विरोधात राज्यभरात वादंग सुरू आहे. दरम्यान या प्रकरणात आज उद्धव ठाकरे आणि मराठी भाषा अभ्यास केंद्राचे प्रमुख दीपक पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली.

मातृभाषा लढ्यासाठी ही पत्रकार परिषद आहे. कारण नसताना हिंदी सक्ती महर्षी द्रोही सरकारकडून लादली जात आहे. पक्षीय भेदाभेद विसरून मराठीसाठी आवाहन करत आहोत. शिवसेना यांना का संपवायची आहे हे लक्षात आलं असेल, असं ठाकरे पत्रकार परिषदेत म्हणाले. दरम्यान दीपक पवार म्हणाले, शालेय शिक्षण अभ्यास कृती समितीचे पदाधिकारी काल उद्धव ठाकरे यांना भेटलो. येत्या रविवारी २९ जूनला जाहीर सभा घेत आहोत. यासाठी ७ जुलै रोजी धरणे आंदोलन करणार आहोत. हुतात्मा स्मारक ते आझाद मैदानात आंदोलन करणार आहोत. हुतात्म्यांना अभिवादन करणार असल्याचंही ते म्हणाले.

ठाकरे पुढे म्हणाले, हिंदी भाषेला विरोध नाही पण सक्तीला विरोध आहे. हिंदी चित्रपट सृष्टीला जोपासलं ते महाराष्ट्राने केलं. मुंबईत येऊन सगळे अभिनेते अभिनेत्री मोठ्या झाल्या. वावडं नाही पण कालांतराने एक निशाण एक विधान असून राज्य सरकारचा एकाधिकारशाहीकडे वाटचाल सुरू आहे. भाषिक आणीबाणी आहे. त्यामुळे आम्ही विरोध करणार आहोत. शिवसेनेतील गद्दार तिकडे राहत आहेत त्यांना बाळासाहेबांचे विचार पुन्हा सांगायची गरज आहे. हिंदी कोणाला येत नाही असं नाही. मी मुख्यमंत्री असताना मराठी भाषेची सक्ती करावी लागली होती. कारण हे मराठी नामशेष करायला निघाले होते.

## उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी हिंदीबद्दल भूमिका घेणे हे बरोबर नाही - रामदास आठवले

मुंबई, २६ जून : महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून त्रिभाषा सूत्राचा अलवंब करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी सरकारच्या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. या एकूण मुद्द्यावर रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी हिंदी ही राष्ट्रभाषा असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे. त्रिभाषा सर्वांना यायला हवी. हिंदी आणि इंग्रजी देखील बोलता येणे आवश्यक आहे. मराठी ही आपली मातृभाषा आहेच, आम्हाला सर्वांना देखील मराठीचा अभिमान आहे. मराठी भाषेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सगळेच विषय शिकवा अशा पद्धतीचा कुठलाही आदेश नाही. हिंदी ही राष्ट्रभाषा असल्याने त्याला नकार देणे बरोबर नाही', असे वक्तव्य रामदास आठवले यांनी केले.

सरकारने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघांच्या दबावात येता कामा नये. उद्धव आणि राज यांनी हिंदीबद्दल भूमिका घेणे बरोबर नाही. ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान विरुद्ध भूमिका आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य तो निर्णय घ्यावा आमचा पक्ष त्यांच्यासोबत आहे. मराठी हा मुद्दा घ्यायला काही हरकत नाही. पण महाराष्ट्राच्या बाहेर गेल्यानंतर हिंदी बोलावं लागतं. आम्ही शाळेत शिकत असताना त्यावेळेस इंग्रजी विषय होता. मी परदेशात गेलो, तर त्या ठिकाणी इंग्रजी भाषा शिवाय पर्याय नाही.'

'आपण सगळे मराठी आहोतच पण हिंदी आपली राष्ट्रभाषा असल्याने तिचा अवमान होता कामा नये. मुंबई ही महाराष्ट्राची आर्थिक राजधानी आहे. मुंबईसारख्या ठिकाणी बहुभाषिक लोक राहतात. अनेक राज्यातील मुले देखील मुंबईत मराठीत बोलतात, मी त्यांना पाहिलं आहे. राष्ट्रभाषेचा आपल्याला अभिमान असला पाहिजे', असे रामदास आठवले म्हटले.

## मुस्लिम महिलेला घटस्फोटासाठी पतीची संमती नको- हायकोर्ट

### तेलंगणा उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

हैदराबाद, २६ जून : मुस्लिम महिलेला 'खुला' (घटस्फोट) घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. तसेच खुल्लासाठी तिला पतीच्या संमतीची देखील गरज नसल्याचा महत्त्वपूर्ण निकाल तेलंगणा उच्च न्यायालयाने दिला. तसेच महिलेला मौलवी किंवा दार-उल-कझा यांच्याकडून खुलानामा (घटस्फोटाचे प्रमाणपत्र) घेण्याची गरज नसल्याचे न्या. मौसमी भट्टाचार्य आणि न्या. बी.रा. मधुसूदन राव यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

तेलंगणातील एका मुस्लिम महिलेने खुलाची मागणी केली होती. परंतु, तिच्या पतीने घटस्फोटास नकार दिला. त्यामुळे महिलेने सदा-ए-हम शरई कॉन्सिल या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून २०२० मध्ये खुला (घटस्फोट) घेतला. या महिलेच्या पतीने सदर खुलाला कौटुंबिक न्यायालयात आव्हान दिले. परंतु, न्यायालयाने पतीची याचिका फेटाळून लावली. त्यानंतर त्याने हायकोर्टात याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने याचिकेवर सुनाववणी करताना न्यायमूर्ती मौसमी भट्टाचार्य आणि न्यायमूर्ती बी.आर. मधुसूदन राव यांच्या खंडपीठाने खुलाच्या संकल्पनेवरील कुराणातील आयती आणि या विषयावरील साहित्याचे परीक्षण केले. न्यायालयाने स्पष्ट केले की, कुराणच्या दुसऱ्या अध्यायातील २२८ आणि २२९ आयाती पत्नीला पतीसोबतचा विवाह रद्द करण्याचा निरपेक्ष अधिकार देतात. खुलाच्या वैधतेसाठी पतीची संमती ही पूर्वअट नाही. पतीने पत्नीची खुलाची मागणी नाकारल्यास कुराण किंवा प्रेषितांच्या शिकवणीमध्ये (सुन्ना) कोणतीही प्रक्रिया विहित केलेली नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या नौदल कर्मचाऱ्याला अटक



जयपूर, २६ जून : पाकिस्तानसाठी हेरगिरी करणार्या नौदल कर्मचारी विशाल यादव याला राजस्थान पोलिसांच्या गुप्तचर शाखेने अटक केली आहे. आरोपी विशाल सोशल मीडियावर एका पाकिस्तानी महिला हँडलरच्या संपर्कात राहून तिला भारतीय नौदल संबंधित महत्त्वाची सामरिक माहिती पुरवत होता.

हरियाणाच्या रेवाडी जिल्ह्यातील पुनसिका येथील रहिवासी असलेल्या विशाल यादव नौदलाच्या डॉकयार्ड संचालनालयात अपर विभागात वरिष्ठ श्रेणी लिपिक (युडीसी) पदावर कार्यरत होता. त्याच्या हालचाली संशयास्पद होत्या. राजस्थान सीआयडी इंटेलिजन्स विभागाची त्याच्या हालचालींवर लक्ष होते. त्याला शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ अंतर्गत अटक करण्यात आली.

या प्रकरणी पोलिस महानिरीक्षक (सीआयडी सुरक्षा) विष्णूकांत गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपीला ऑनलाइन गेमिंगचे व्यसन होते. या व्यसनाच्या आहारी जावून आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्याने संवेदनशील माहिती देण्यास सुरुवात केली. क्रिप्टोकरन्सीद्वारे आर्थिक व्यवहार करत होता. विशाल सोशल मीडियावर प्रिया शर्मा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका पाकिस्तानी महिला हँडलरच्या नियमित संपर्कात होता. तिने त्याला नौदल मोहिमांमधील अत्यंत महत्त्वाची सामरिक माहिती देण्याच्या बदल्यात पैशांचे आमिष दाखवले होते. यादवला ऑनलाइन गेमिंगचे व्यसन होते. या व्यसनाच्या आहारी जावून आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्याने संवेदनशील माहिती देण्यास सुरुवात केली. त्याला क्रिप्टोकरन्सी वॉलेटमध्ये (यूएसडीटी मध्ये) आणि बँक खात्यांमध्ये पैसे पाठवण्यात आले होते. पोलिसांनी सांगितले की, यादवच्या मोबाईल फोनच्या फॉरेन्सिक विश्लेषणात चॅट रेकॉर्ड्स आणि कागदपत्रांसह अनेक ठोस पुरावे सापडले आहेत. यापूर्वी 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यानही त्याने नौदलाची संवेदनशील माहिती उघड केल्याचे यातून स्पष्ट झाले आहे.

## श्री रेणुकादेवी मंदिर संस्थानची संरक्षक भिंत कोसळली!

### लिफ्ट आणि स्काय वॉकचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने चक्क जेसीबीद्वारे खालून पोखरली भिंत; भाविकांनी दिलेले पूजासामग्री साहित्य मातीमोल

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि.२६ जून -**

माहूर गडावरील श्री रेणुका माता मंदिरावर जाण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लिफ्ट आणि स्काय वॉकच्या कामाला मंजुरी देऊन ५०कोटी पेक्षा जास्त निधी दिला होता. या निधीतून कंत्राटदार गुरुबक्षांनी यांनी मंदिराच्या पश्चिम बाजूचा भाग पोखरून संरक्षक भिंत तात्काळ उभी केली नसल्याने श्री रेणुका माता मंदिराचा जुन्या परकोटची भिंत पावसामुळे कोसळली असून या परकोटला लागून असलेल्या खोल्यातील भाविकांनी दिलेले मौल्यवान पूजेची सामग्री पातळ,समई आणि इतर साहित्य मातीत मोल झाली असून मंदिराच्या मुख्य भिंतीपासून थोड्या अंतरावरील भिंत कोसळल्याने मुख्य मंदिराला धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने घडलेल्या घटनेने प्रचंड





खळबळ उडाली आहे.

श्री रेणुका देवी संस्थानवर जाणाऱ्या लिफ्ट आणि स्काय वॉक च्या बांधकामासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी निधी देऊन एका वर्षात काम पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या होत्या परंतु ,गेल्या चार ते पाच वर्षांपासून सदर काम संथगतीने सुरू असल्याने यावर्षी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पाहणी करून कंत्राटदार गुरु बक्षांनी यांना काम तात्काळ सुरू करण्याच्या सूचना दिल्याने त्यांनी मुख्य मंदिराच्या पश्चिम बाजूचा भाग पोखरला होता.परंतु संरक्षक भिंत आणि काय वॉक च्या कामाला त्यांनी गती दिली नाही.परिणामी दि.२५ रोजी सायंकाळपासून सुरू झालेल्या दमदार पावसामुळे पोखरून ठेवलेल्या भागाच्या भिंतीखालील माती ढासळल्याने जवळजवळ २५मीटर लांब संरक्षक भिंत अचानकपणे कोसळली. त्यामुळे या भिंतीला लागून असलेल्या खोल्यात ठेवलेले पूजेचे साहित्य समया आणि भाविकांनी दिलेले पातळ,ओटीचे साहित्य आणि पूजेचे सर्व साहित्य भिंतीच्या दगड विटा माती मध्ये दबल्यागेल्याने खराब झाले. भिंत कोसळल्याने श्री रेणुका मातेच्या मुख्य मंदिराला सुद्धा धोका पोहोचला असेल यात अशीही शंका जाणकारांनी व्यक्त केली आहे. काही वृत्तपत्र माध्यमांनी याबाबत बऱ्याच दिवसांआधीच वृत्त प्रकाशित करुन संस्थानचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न देखील केला होता परंतु संस्थांनचे पदसिद्ध अध्यक्ष जिल्हा सत्र न्यायाधीश आणि सचिव सहाय्यक जिल्हाधिकारी,कोषाध्यक्ष तहसीलदार,उपाध्यक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी आणि तत्कालीन विश्वस्तांनी गंभीर बाबीकडे साफ दुर्लक्ष केल्याने कंत्राटदारांनी मनमानी पद्धतीने बांधकाम हळूहळू सुरू ठेवत येथील व्यापाऱ्यांना त्रस्त करून सोडले होते. कंत्राटदारांनी आधी संरक्षक भिंत उभी करणे ऐवजी काम सुरू असल्याची देखावा करण्यासाठी विनाकारण मुख्य मुख्य मंदिराच्या संरक्षक भिंतीच्या खालपर्यंत मजुरांद्वारे खोदकाम करण्याऐवजी चक्क जेसीबी द्वारे खोदकाम केले होते हे येथे उल्लेखनीय आहे.सर्व संबंधितांनी माध्यमांच्या व नागरिकांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने ही भयंकर घटना घडली असून सुदैवाने जीवितहानी झाली नसली तरी मुख्य मंदिराला धोका पोहोचेल अशी घटना घडल्याने भाविकातून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई व्हावी अशी मागणी लाखो भाविकातून होत आहे.

## पावसाळी अधिवेशनाचा मुहूर्त ठरला

मुंबई : यंदाच्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा मुहूर्त ठरलेला आहे. येत्या ३० जून ते १८ जुलै या काळात पावसाळी अधिवेशन होणार आहे. यंदाच्या पावसाळी अधिवेशनात शाळांमध्ये पहिलीपासूनची हिंदी भाषेची सक्ती, शक्तीपीठ महामार्ग आणि कर्जमाफीच्या मुद्द्यावरुन विरोधकांकडून महायुती सरकारला घेरले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे २९ जूनला प्रथेप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम होणार आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने विरोधी पक्षातील आमदार विविध समस्या आणि मुद्द्यांवरुन सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतील. या सगळ्याला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महायुती सरकारचे मंत्री कशाप्रकारे सामोरे जाणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## विद्यालयात शिक्षकाचा गळफास

जळगाव, २६ जून - पाचोरा शहरातील देशमुख वाडी परिसरात असलेल्या पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेच्या सुपडु भादू प्राथमिक विद्यालयात एका शिक्षकाने दोराने गळफास लावून फाशी घेतल्याची घटना घडली. हा शिक्षक विविध व्यसनाने जडलेला असल्याने मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झालेला होता. त्यामुळे त्या शिक्षकांनी हे पाऊल उचलले, अशा चर्चेला उधाण आले होते. घटनास्थळी पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे चेअरमन संजय वाघ, संचालक सतीश चौधरी, वासुदेव महाजन, भूषण वाघ, भडगाव महाविद्यालयाचे प्राचार्य गायकवाड यांनी भेट दिली. मूळचे दहिगाव संत ता. पाचोरा येथील रहिवासी असलेले व ह. मु. आशीर्वाद ड्रीम सिटीत राहत असल्याने शिक्षक रविंद्र भारत महाले (वय - ४२ वर्ष) हे देशमुखवाडी परिसरातील पहिली ते चौथीपर्यंत असलेल्या प्राथमिक शाळेत गेल्या बावीस वर्षांपासून कार्यरत होते. नित्याप्रमाणे २५ जुन रोजी सकाळी सात वाजता शाळा भरल्यानंतर सकाळी साडेनऊ वाजता जेवणाची सुट्टी झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी जेवणासाठी खाली पाठवले.

दरम्यान तिसऱ्या मजल्यावर समोरच्या रिकाम्या खोलीच्या दरवाजाची आतून कडी लावून त्यांनी छताच्या कडीला ३० ते ३५ फुट दोरी गळ्याला आवळला. प्रथम खुर्चीचा सहारा घेत टेबलावर चढत दोरीला गळफास लावून शिक्षकाने आत्महत्या केली. दरम्यान पाच ते सहा विद्यार्थी लवकर जेवण आटवून नित्याप्रमाणे त्या रूममध्ये इतर विद्यार्थ्यांचे जेवण होईपर्यंत खेळत होते. अश्यात दरवाजाच्या फटीतून विद्यार्थ्यांनी बघीतले असता सदरची घटना लक्षात आली. त्यांनी धावत जाऊन दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र आतून दरवाजा बंद होता. विद्यार्थ्यांनी पळत जाऊन खाली उभे असलेल्या आशिष पाटील व शार्दुल वाघ सह इतरांना याबाबत माहिती दिली. तीन - चार शिक्षक धावत तिसऱ्या मजल्यावर गेले. या शिक्षकांनो पळत जाऊन पाहिले असता शिक्षकाने आतून दरवाजाची कडी बंद केलेली होती. दरवाजा उघडत नसल्याने शिक्षकांनी दरवाजा तोडून शिक्षक रवींद्र महाले यांना मयत अवस्थेत खाली उतरवून पोलिसांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधला. मयत शिक्षक रवींद्र महाले यांच्या पाश्चात वृद्ध आई, वडील, पत्नी, एक भाऊ, एक बहीण, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. घटनास्थळी पोलीस निरीक्षक अशोक पवार, सहायक पोलीस निरीक्षक संजय निकुंभ, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा घायळ यांनी पंचनामा केला. मृतदेह रुग्णवाहिका चालक अमोल पाटील व किशोर लोहार यांच्या मदतीने पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला. मयत शिक्षक रवींद्र महाले यांचे शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमित साळुंखे यांनी केल्यानंतर दुपारी ३:३० वाजता त्यांच्यावर दहिगाव संत येथे अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## लोकशाहीच्या रक्षणात संघ परिवारीची भूमिका मोठी- नितीन गडकरी

नवी दिल्ली, २६ जून : आणीबाणीच्या काळात लोकशाहीचे रक्षण करण्यात संघ परिवाराने महत्त्वाची भूमिका वठवल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. आणीबाणीला ५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने हिंदुस्थान समाचार वृत्तसंस्थेतर्फे आज, गुरुवारी दिल्लीच्या डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे, हिदुस्थान समाचारचे समूह संपादक पद्मश्री रामबहादुर राय, मध्यप्रदेशचे उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ल,राष्ट्रीय स्वाभीमान आंदोलनचे अध्यक्ष के.एन. गोविंदाचार्य, हिंदुस्थान समाचारचे अध्यक्ष अरविंद्र मार्डीकर, डॉ. आंबेडकर स्मारकाचे संचालक आकाश पाटील, इंदिरा गांधी कला केंद्राचे सचिव डॉ. सच्चिदानंद जोशी आणि संघाचे माजी सरकार्यवाह सुरेश उपाख्य भय्याजी जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी गडकरी म्हणाले की, देशात १९७५ मध्ये लावलेल्या आणीबाणीच्या माध्यमातून लोकशाही चिरडण्याचा प्रयत्न झाला. अशा वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघ परिवारातील संघटनांनी लोकशाहीच्या रक्षणार्थ महत्वाची भूमिका वठवली. वर्तमानातील पिढीला हा इतिहास माहिती असे आवश्यक असल्याचे गडकरी यांनी सांगितले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपली सत्ता वाचवण्यासाठी संविधानाचा मूळ आत्मा बदलला, प्रेस, संसद आणि न्यायव्यवस्थेवर दबाव आणला गेला. त्या काळात भीतीचे वातावरण इतके होते की लोक त्यांच्या हक्कांसाठी आवाजही उठवू शकत नव्हते. आणीबाणीच्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रे छापली जात नव्हती, असे गडकरी यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली.
जल जीवन मिशन
ग्रामीण भागातील सर्व नागरीकांना वैयक्तिक नळ जोडणीच्या माध्यमातून ५५ लीटर दरडोई दररोज शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे
ए.बी.साळुंके
कार्यकारी अभियंता
ग्रा.पा.पु.विभाग
जि.प.,हिंगोली.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# आणीबाणीच्या काळातील घटनांचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -** देशात २५ जून १९७५ रोजी लागू झालेल्या आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवारी प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनाद्वारे आणीबाणीच्या काळातील आव्हानात्मक परिस्थितीत लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांना उजाळा देण्यात आला आहे.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, अहिल्या गाठाळ, गणेश पवार, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, आणीबाणीच्या काळात बंदिवास भोगलेले माजी आमदार प्रा. मनोहर पटवारी, प्रदीप पाटील खंडापूरकर, सुभाष निंबाळकर, अनिल अंदोरीकर, अशोक मठपती उपस्थित होते.

आणीबाणीचा कालखंड हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या पिढीला त्या काळातील घटनांचा इतिहास आणि लोकशाहीच्या संरक्षणाचे महत्त्व समजण्यास मदत होईल, असे मत प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी व्यक्त केले.

लातूर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत आणीबाणीच्या ५०व्या वर्षपूर्तीनिमित्त हे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात आणीबाणीच्या काळातील महत्त्वाच्या घटना आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

आणीबाणीत बंदिवास भोगलेल्या व्यक्ती, त्यांचे कुटुंबीय आणि नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली. हे प्रदर्शन २७ जून २०२५ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### कै.देशमुख महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे आणि ग्रंथपाल प्रा. महावीर कटके यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रा. महारुद्र बिडवे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.
अभिवादन कार्यक्रमाच्या वेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग मुंढे, स्टाफ सचिव प्रा. चंद्रकांत मोरे, हणमंत शिंदे, डॉ.अंगद कोते, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. जयदेवी पवार, प्रा.बालिका गौंड यांची उपस्थिती होती.

### महावितरणचे मंडळ कार्यालयही एमआयडीसी भागात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
जूने पॉवर हाऊस परिसरात असलेल्या महावितरणच्या मंडळ कार्यालयाचे स्थलांतर करण्यात आले असून एमआयडीसी मधील परिमंडळ कार्यालय परिसरात मंडळ कार्यालय सुरू करण्यात आले आहे.
वीजग्राहक व संबंधीत आस्थापनांनी याची दखल घेवून नवीन कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांनी केले आहे. १८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री परिमंडळ कार्यालयास आग लागून मोठे नूकसान झाले होते. या आगीमध्ये मंडळ कार्यालयासही झळ बसून अधीक्षक अभियंता यांच्या केबीनसह बरेच फर्निचर जळाले होते. परिमंडळ कार्यालय यापुर्वीच स्थलांतरीत करण्यात आले होते. आता मंडळ कार्यालयाचेही फर्निचरचे काम पुर्णत्वास आल्याने नुकतेच मंडळ कार्यालयाचे संपूर्ण कामकाज एमआयडीसी परिसरातील किर्ती ऑईलमील समोर असलेल्या महावितरणच्या जागेत सुरू करण्यात आले आहे. वीजग्राहकांसह महावितरणशी संबंधीत कामकाजासाठी नागरिकांनी या बदलाची नोंद घेण्याचे आवहान करण्यात आले आहे.

### सिकंदरपूरकरांच्या वतीने दिलीपराव देशमुख यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
येथील उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीने राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या नावाने शेतकरी, शेतमजूरांच्या मुलींसाठी बांधलेल्या देशातील पहिल्या वसतिगृहाची निर्मिती माजी मंत्री तथा सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या संकल्पनेतून झाली.

वसतिगृहाचा शुभारंग राष्ट्रमाता राजमाता यांच्या पुण्यस्मरण दिनापासून झाली. वसतिगृहात पार पडलेल्या कार्यक्रमात स्मार्ट व्हिलेज सिकंदरपूरकरांच्या वतीने माजी मंत्री देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जगदीश बावणे, तुळशीराम गंभीरे, माधव गंभीरे, आबासाहेब पाटील, ॲड. उदय गवारे, प्रवीण पाटील, उद्धव पाटील, ज्योतीराम कदम उपस्थित होते.

### इस्कॉनच्या वतीने लातूरमध्ये जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन )लातूरच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार दिनांक २७ जून रोजी बसस्टॅन्ड च्या पाठीमागील आंबीका मंदिर येथून रथयात्रेला सुरुवात होणार आहे.

येथून ही रथयात्रा सुभाष चौक, सराफ लाईन ,गंजगोलाई ,गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मार्गे वाडा हॉटेल मार्ग जाऊन कस्तुराई मंगल कार्यालय या ठिकाणी समारोप होणार आहे. यामध्ये हजारो वैष्णव भावीक भक्तांच्या उपस्थितीमध्ये हरिनाम संकीर्तन, प्रसाद वितरण होणार आहे. तसेच संध्याकाळी कस्तुराई मंगल कार्यालय या ठिकाणी कीर्तन, प्रवचन,महाआरती आणि सर्वांसाठी भोजन महाप्रसाद होणार आहे. या कार्यक्रमाचा सर्व नागरिकांनी लाभघेण्याचे आवाहन इस्कॉन लातूरचे अध्यक्ष धर्मराज प्रभु यांनी केले आहे.

# तरुणीला चिरडण्याचा प्रयत्न

## गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
शहरापासून जवळच असलेल्या आर्वी शिवारातील एका मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेल्या तरुणीस जीवे मारण्याची धमकी देत, तिच्या अंगावर कार घालून तिला चिरडण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी सोमवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एका महिलेविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



लातूर शहरातील आम्लेश्वरनगरात राहणाऱ्या राधिका विराज पाटील या समाजसेविका म्हणून काम करतात. नेहमीप्रमाणे त्या २२ जून रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास लातूर शहरापासून जवळच असलेल्या आर्वी शिवारातील एका मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी आर्वीच्या युगंधर सोसायटीत राहणाऱ्या शहजादी मुजीब शेख या महिलेने राधिका पाटील यांना मंदिरात दर्शनासाठी का येते, तू लय दादागिरी करते, तुला खतम करते, म्हणून जीवे मारण्याची धमकी देत धक्काबुक्की करण्यास सुरूवात केली. त्यावेळी तेथे उपस्थित नागरिकांनी सोडवासोडव केली. यानंतर राधिका पाटील या मंदिर परिसरात लावलेली दुचाकी घेण्यासाठी जात असताना शहजादी शेख या महिलेने तिच्या ताब्यातील आल्टो कार (एम. एच. २४ व्ही. ८३९४) पाटील यांच्या अंगावर घालून चिरडण्याचा प्रयत्न केला, असे राधिका पाटील यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी शहजादी शेख या महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करीत आहेत.

# उध्दव-राज एकत्र आल्यास राज्यातील चित्र वेगळे असेल : चंद्रकांत खैरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
सद्या उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्रित यावेत, अशी चर्चा आहे. दोघे एक व्हावे असे राज्यातील सर्वसामान्य मराठी माणसाला वाटते. तसे झाल्यास राज्यातील राजकीय चित्रच वेगळे असेल, असे मत माजी खासदार तथा ठाकरे सेनेचे नेते चंद्रकांत खैरे यांनी बुधवारी (दि.२५) येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रक्रिया तत्काळ सुरू कराव्यात, असे आदेशित केल्यानंतर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. याचाच एक भाग म्हणून ठाकरे सेनेचे नेते चंद्रकांत खैरे आणि उपनेते विजय कोळी हे लातूर जिल्हा दौऱ्यावर आले असता,



बुधवारी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व बालाजी रेड्डी, महिला आघाडीच्या अध्यक्षा सुनीता चाळक, जिल्हा संघटक जयश्री उटगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी खैरे म्हणाले, राज्यात आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका आम्ही संपूर्ण ताकदीने, स्वबळावर लढायची तयारी ठेवणार आहोत. कार्यकर्त्यांची आढावा बैठक, संघटन मजबूत करण्यासाठी हा दौरा असून, लातूर जिल्ह्यात ठाकरे सेनेला भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे सांगत लवकरच गट प्रमुखांचा मेळावा घेण्यात येणार असल्याचे यावेळी खैरे यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिका निवडणूक डोळ्यांसमोर ठेऊन भाजप मराठी मते मिळविण्यासाठी विविध कपट, कारस्थाने करत आहे. परंतु, मुंबई ही मराठी माणसांची होती आणि राहील, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपनेते विजय कोळी यांनी राज्यात सद्या भाजप प्रणित सरकारकडून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी यांची पिळवणूक सुरू आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये या सरकारला सळो की पळो करून सोडणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# राज्यातील सुधारित पीक विमा योजनेचा जाहीर निषेध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
महाराष्ट्र शासनाने सन २०२५ २६ करीता सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना जाहीर केले आहे त्याचा जाहीर निषेध महाराष्ट्र राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.

शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना एक रुपयात विमा जाहीर केला होता, परंतु आता सुधारित योजनेत सोयाबीनला प्रतिहेक्टर ११६० रुपये,कापसासाठी ९०० रुपये, तुरीसाठी ४७० रुपये शेतकऱ्यांना भरावे लागणार आहेत. शासनाने पूर्वी १५ ऑगस्टपर्यंत पेरणी न झाल्यास किंवा दुबार पेरणी झाल्यास २५% रक्कम देण्याची तरतूद रद्द केली आहे.नैसर्गिक आपत्तींचा कुठलाही घटक आता या योजने मध्ये नाही.

ज्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणे कठीण होईल. कृषी विभागाने शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे उत्पन्न कमी दाखवून आणि उत्पन्नाची आकडेवारी ८ ते ९ क्विंटल प्रति हेक्टर करून ठेवल्यामुळे विमा मिळणार नाही. आता विमा कंपनीसोबत ८०% वाटा सरकारचा आहे त्यामुळे शेतकऱ्यांना विमा नाही मिळाला तर शासनाचा फायदा होईल असे धोरण नवीन योजनेत राबवले आहे त्यामुळे या योजनेचा जाहीर निषेध करतो व पूर्वीप्रमाणेच पिक विमा धोरण ठेवावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.

# सहकार मंत्री पाटील यांनी घेतली गोजमगुंडे परिवाराची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
महाराष्ट्राचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी माजी नगराध्यक्ष तथा सिध्देश्वर देवस्थान व लातूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी गोजमगुंडे परिवाराच्या वतीने त्यांचा हृदयपूर्वक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ना. पाटील यांनी विविध विषयांवर गोजमगुंडे परिवारासोबत मनमोकळा संवाद साधला.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे लातूर दौऱ्यावर असताना त्यांनी माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्या मंठाळे नगर येथील अस्मिता निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान ना. पाटील यांनी



गोजमगुंडे परिवारासोबत असलेल्या कौटूंबिक संबंधांना उजाळा दिला. यामध्ये तत्कालिन राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांच्या कार्यकाळात नगराध्यक्ष व बाजार समिती सभापती म्हणून आपण कार्य केले असल्यामुळे बाळासाहेब जाधव यांच्यासोबत अनेक राजकीय कार्यक्रमांना व विविध बैठकींना उपस्थित राहण्याचा योग आला असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी सांगितले. यानिमित्ताने आपल्या परिवाराशी अधिकचा स्नेह जोडला गेला असल्याचे विक्रम गोजमगुंडे यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर लातूर शहरासह जिल्ह्याच्या राजकीय परिस्थितीबाबत विस्तृत चर्चाही केली. तसेच विविध प्रश्नांबाबत गोजमगुंडे परिवाराकडून मतेही जाणून घेतली. याप्रसंगी ना. पाटील यांनी सहकार क्षेत्रातील अनेक बाबींवर चर्चा करून लातूरसह मराठवाड्यातील सहकार क्षेत्राला अधिक प्रगत आणि विकसित करण्यासाठी कोणत्या कोणत्या उपाय योजना होऊ शकतात याबाबतही चर्चा केली. तसेच जिल्ह्याच्या विकासाबाबत काय करता येईल याबाबतही गोजमगुंडे परिवाराकडून माहिती घेतली. यावेळी पाटील यांचे स्वागत करण्यात आले.

# होरे कुटुंबीयांच्या वतीने वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
तालुक्यातील अंबुलगा (बु) येथील ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी विठ्ठल होरे यांचे दि २० जून रोजी निधन झाले. त्यांचा मुलगा चंद्रकांत होरे, नातू विशाल भिसे व त्यांच्या कुटुंबीयांनी पारंपारिक प्रथेला आणि कर्मकांडाला फाटा देत त्यांच्या स्मृती कायम जिवंत ठेवण्यासाठी समाजापुढे एक आदर्श पांयडा घालून देत वृक्षारोपण केले आहे.

निधनानंतर वडिलांची राख नदीत विसर्जित करू नये. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण होते, नदी दूषित होते म्हणून असे न करता वेगळा निर्णय चंद्रकांत होरे व त्यांचे कुटुंबीयांनी घेऊन यापेक्षा शेतात वेगवेगळ्या प्रकारचे फळझाडे, सावली देणारी झाडे लावून त्या ठिकाणी रक्षा विसर्जित करावी असा असा निर्णय घेत होरे कुटुंबीयांनी वेगवेगळ्या प्रकारची २१ झाडे शेतात लावून वडीला प्रति स्नेहभाव तसेच कृतज्ञता बाळगून त्यांच्या स्मृती कायम जिवंत ठेवल्या आहेत. शेतात झाडे लावून झाडांना रक्षा विसर्जित केल्यामुळे होरे कुटुंबीयांच्या उपक्रमाचे समाजात सर्वत्र कौतुक होत आहे.

# परवानगीशिवाय होर्डिंग्ज, पोस्टर्स छपाई केल्यास कारवाई

## आयुक्त मानसी मीना ‘ॲक्शन मोड’वर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची परवानगी असल्याशिवाय डिजिटल बॅनर्स, होर्डिंग्जची प्रिटींग प्रेस मालकांनी छपाई करू नये, तसे आढळून आल्यास प्रिंटींग प्रेसच्या मालकांवर कारवाई करण्याचा इशारा महापालिका आयुक्त मानसी मीना यांनी दिला आहे.

आयुक्त मानसी मीना यांनी महापालिकेत शहरातील सर्व प्रिंटींग प्रेस मालकांची बैठक घेतली. अनधिकृत पोस्टर्स, होर्डिंग्ज, जाहिरात फलकांमुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. रस्त्याच्या कडेला लावण्यात येणाऱ्या मोठ्या बॅनर्समुळे अनेक अपघात होत आहेत. हे बॅनर्स शहरातील प्रिंटींग प्रेसमधून छपाई करण्यात येतात. यापुढे महापालिकेच्या परवानगीचा कोड क्रमांक असल्याशिवाय प्रिंटींग प्रेस मालकांनी कोणत्याही बॅनर, पोस्टर्स, होर्डिंग्जची छपाई करू नये, अन्यथा थेट कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. सध्या होर्डिंगविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल आहे. त्यानुसार न्यायालयाच्या सूचनांचे पालन सर्व प्रिंटींग प्रेस मालकांनी करावे, अशा सूचनाही आयुक्त मीना यांनी केल्या. यावेळी उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत यांच्यासह शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक, अतिक्रमण विभाग प्रमुख रवी कांबळे, शुभम बावणे उपस्थित होते.

# निलंग्यातही बोगस बियाणामुळे १०० एकरांवर दुबार पेरणीचे संकट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २६ जून -**
जिल्ह्यातील कासार शिरसी, हरिजवळगा, अनसरवाडा, पौळ अंबुलगा अशा अनेक गावांतील जवळपास ३५ शेतकऱ्यांनी नामांकित कंपनीचे सोयाबीन बियाणे पेरले. मात्र, ते बोगस निघाल्याने जवळपास १०० एकर क्षेत्रावर दुबार पेरणीचे संकट आले आहे. पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

या वर्षी खरीप पेरणी अगोदरच पावसाने हजेरी लावली. जमिनीत ओलावा झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी बाजारातून नामांकित कंपनीचे महागडे खते, बियाणे खरेदी करून खरीप हंगामाची पेरणी केली. मागील अनेक वर्षांपासून नामांकित असलेल्या महाबीज कंपनीच्या बियाण्याची शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आली होती. ते बियाणे पेरणी



केल्यानंतर उगवले नाही. अशा बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटाला समोर जावे लागत आहेत. परिसरातील अनेक शेतकऱ्यांना महाबीजच्या बोगस बियाण्याची पेरणी केल्यामुळे शेतामध्ये पेरणी करून आठवडा उलटला तरी बियाणे उगवत नसल्याच्या शेतकऱ्यांकडून कृषी कार्यालयाकडे ३२ तक्रारी करण्यात आल्या आहेत. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पंचनामे करून आर्थिक मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

### महाबीजचे बियाणे उगवले नाही

शेतातील सर्वे नंबर ३४ मध्ये महाबीज कंपनीचे ७२६ या वाणाचे एकूण १५ बॅग बियाण्याची पेरणी केली होती. एका बॅग बियाण्याची किंमत १७०० या दराने खरेदी केली आहे. शेतातील १६ एकर क्षेत्रावर याच कंपनीच्या बियाण्याची पेरणी केली होती. पेरणी करून आठवडा उलटला तरी जमिनीतून बियाण्याची उगवण होत नाही. या बोगस बियाण्यामुळे दुबार पेरणीची वेळ आली आहे.

**– प्रवीण पौळ,** शेतकरी, पौळ अंबुलगा.

### कृषी कार्यालयात तक्रार करावी

ज्या शेतकऱ्यांच्या बियाण्यांसंदर्भात तक्रारी आहेत त्या शेतकऱ्यांनी तालुका कृषी कार्यालयात येऊन तक्रार करावी. सध्या महाबीज महामंडळाच्या बियाणासंदर्भात तक्रार आली आहे. त्या संदर्भात तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक बोलावून पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकर मदत करण्यात येईल.

**– नाथराव शिंदे,** तालुका कृषी अधिकारी, निलंगा.

हरीजवळा येथील शेतकरी विष्णू साबदे यांनी आपल्या शेतात १० एकर महाबीज कंपनीच्या सोयाबीन बियाणाची पेरणी केली दहा दिवस झाले उगवण झाली नाही. घरात कुणीही कमावते नाही. त्यामुळे त्यांच्यावर मोठे संकट ओढावले असून, पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी साबदे यांनी केली आहे.

## ऊर्जा कार्यक्षमता वाढवण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र वीज निर्मिती महामंडळाची उपकंपनी महात्मा फुले रिन्यूएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी लिमिटेड (महापीआरईआयटी) (महाप्रीट) आणि युनायटेड नेशन्स ऑफिस फॉर प्रोजेक्ट सर्विसेस (यूएनओपीएस)द्वारे संचालित आंतरराष्ट्रीय संस्था सस्टेनेबल एनर्जी फॉर ऑल (एसईफॉर ऑल) यांनी सहयोग करत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली आहे, ज्याअंतर्गत महाराष्ट्र राज्यात ऊर्जा कार्क्षमता (ईई) अंमलबजावणीला गती देण्यात येईल.

## आरोग्य सेवा आणि रोजगाराच्या संधीत वाढ

मुंबई- महाराष्ट्रात स्थापन झालेली आणि मुख्यालय असलेली झेनो हेल्थ, या वर्षी मुंबई, पुणे आणि नाशिकमध्ये ७५ नवीन मेडिकल स्टोअर्स दुकान उघडण्याचा निर्णय घेतला.. या विस्तारासह, महाराष्ट्रातील झेनोच्या एकूण स्टोअरची संख्या २६० पर्यंत पोहोचेल आणि सुलभ परवडणाऱ्या आरोग्यसेवेसाठी दीर्घकालीन वचनबद्धतेची पुष्टी होईल. या उपक्रमाद्वारे ५०० हून अधिक परवानाधारक फार्मासिस्टना निश्चितच रोजगार उपलब्ध होईल. या विस्ताराचा भाग म्हणून झेनो हेल्थ वर्षभर महाराष्ट्रात ३० कोटींची गुंतवणूक करेल.

## ओपन-एंडेड इक्विटी योजना

छत्रपती संभाजीनगर: बजाज फिन्सर्व्ह एएमसीने 'बजाज फिन्सर्व्ह स्मॉल कॅप फंड'च्या सुरूवातीची घोषणा केली आहे. हा एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून, प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करतो आणि गुणवत्ता, वाढ व मूल्य यांचा लाभ देतो. या फंडासाठी सदस्यता २७ जून २०२५ पासून सुरू होणार असून, ११ जुलै २०२५ रोजी बंद होणार आहे.

## स्ट्रगल फॉर सर्वायव्हल अँड रिवायव्हल पुस्तकाचे प्रकाशन

मुंबई : डॉ. विश्वास पानसे लिखित एनपीए नाईटमेअर: स्ट्रगल फॉर सर्वायव्हल अँड रिव्हायव्हल या पुस्तकाचा भव्य प्रकाशन सोहळा मुंबईच्या रेडिसन एमआयडीसी, अंधेरी (ईस्ट) येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी बँकिंग आणि उद्योग क्षेत्रातील प्रमुख व्यक्तीमत्वे उपस्थित होती. मुख्य अतिथी श्री सतीश मराठे (संचालक - केंद्रीय मंडळ, भारतीय रिझर्व्ह बँक) आणि विशेष अतिथी श्री चंद्रकांत साळुंखे (संस्थापक व अध्यक्ष एसएमई चेंबर ऑफ इंडिया) यांनी विशेषतः एनपीएशी झुंजणाऱ्या एमएसएमई कर्जदारांच्या संघर्षाला उजाळा देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## शांतीबाई राठोड यांचे निधन



कन्नड :- दि.२६ जून - तालुक्यातील वडनेर येथील कै शांतीबाई बाबू राठोड यांची दि.२६ रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पार्थिवावर वडनेर येथे दूपारी अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात तीन मूले,एक मूलगी,सूना नांतवंडे असा परीवार आहे

# शिवाजी नागरी बँकेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

पैठण दि २६ :- येथील शिवाजी नागरी सहकारी बँकेतर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त तालुक्यातील इ. १० वी व १२ वी इयत्तेतील उच्चतम गुणवत्तेनुसार उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा पैठण येथील माहेश्वरी भक्त निवास येथे उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थिती पार पडला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी नागरी बँकेचे चेअरमन रविंद्र शिवाजीराव काळे तर प्रमुख पाहुणे म्हणून सहायक निबंधक बलराम नवथर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक व मुख्याध्यापक, प्राचार्य यांचा मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित होती. या कार्यक्रमांस व्हा. चेअरमन भाऊसाहेब औटे, संचालक हरीपंडीत गोसावी, रामचंद्र काळे, पाशा धांडे, पृथ्वीराज चौहान, शंकरराव राऊत, अरुण नरवडे, अशोक जाधव, दशरथ सोनवणे, श्यामसुंदर लोहिया, राजेंद्र टेकाळे, कारभारी लोहकरे, सौ. तनुजा जाधव, तज्ञ संचालक अँड. राजेंद्र धरपळे, गणेश शिलवंत, अँड. किशोर वैद्य, दत्तात्रय फटांगडे, सोमनाथ परदेशी, हसनुद्दीन कट्यारे, फाजल टेकडी,राजू निवारे, उदय काळे, प्रा. संतोष गव्हाणे,सोमनाथ जाधव, ज्ञानेश्वर पानखडे आप्पासाहेब सोनवणे, लक्ष्मण चौरे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई.आय. पठाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जी.व्ही. म्हस्के, मुख्य शाखाधिकारी संतोष राऊत,सुधाकर शिंदे, विजय पोषणगीर, कृष्णा काकडे, अमोल काळे, रेवती राजनिकर, रत्नदीप मुळे, बाळू दसपुते,किशोर धोकते, आंबेद पठाण, भाऊसाहेब कणसे, आशिष पवार, फोजी जाधव आदी उपस्थित होते.

# पत्रकार प्रशांत माने लिखित 'लोकाभिमुख पत्रकारिता' पुस्तकाचे रविवारी प्रकाशन

### सुशीलकुमार, मोहिते-पाटील, सुभाषबापू यांच्या उपस्थितीत हेरिटेज येथे कार्यक्रम




सोलापूर : नवोदित पत्रकारांसाठी उपयुक्त ठरेल अशा आशयाचे पत्रकार प्रशांत माने लिखित लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. २९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता होटगी रोड गांधीनगर येथील हेरिटेल गार्डन कार्यालयात होणार आहे.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी सहकार मंत्री आ. सुभाषबापू देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ. देवेंद्र कोठे, ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. धनंजय माने, दैनिक तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, ज्येष्ठ संपादक राजा माने यांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे.

तीस वर्षांच्या पत्रकारिता प्रवासातील अनुभव आणि पत्रकारितेत नव्याने येणार्या नवोदित पत्रकारांसाठी उपयुक्त ठरेल अशा आशयाचे पुस्तक लेखक पत्रकार प्रशांत माने यांनी लिहिलेले असून जागृती प्रकाशनने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पत्रकारांना उपयुक्त आशयासह काही कानमंत्रदेखील पुस्तकातून देण्यात आलेले आहेत. या पुस्तकातून प्रशांत माने यांच्या बातम्यांची कात्रणे देखील नवोदित पत्रकारांना अभ्यासासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. पत्रकारांचे राजकीय आणि सामाजिक ऋणाणुंबध कसे असावेत यावर देखील पुस्तकातून छायाचित्रांच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. वाचकांसह नवोदित पत्रकारांच्या पसंतीस पडेल अशा या लोकाभिमुख पत्रकारिता पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यासाठी सर्वांनी आवर्जुन उपस्थित रहावे, असे आवाहन लेखक पत्रकार प्रशांत माने यांनी केले आहे.

# ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये राजर्षी छत्रपती शाहु महाराज जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ जून

पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. सर्वप्रथम शाळेच्या मुख्यध्यापिका सविता सतिश तोतला यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतेमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांची उपस्थीती होती. शाळेच्या मुख्यध्यापीका सविता सतिश तोतला यांनी आपल्या भाषणाद्वारे शाहु महाराजांच्या जिवन चरित्र्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता तिसरी ते सातवी च्या विद्यार्थ्यांनी शाहु महाराजांविषयी भाषणे करत उपस्तितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतिल विद्यार्थी विद्या पाटील व रुद्राणी कांबळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.

# सद्गुरु प्रसाद महाराज अमळनेरकर यांचे बिडकीन येथे भव्य स्वागत



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ जून : पैठण तालुक्यातील बिडकीन येथे सालाबाद प्रमाणे महंत सद्गुरु प्रसाद महाराज यांच्या पायी दिंडीचे दि २४ मंगळवार रोजी दिलीप देवळांकर यांच्या निवासस्थानी मोठ्या थाटामाटात फटाक्याच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. महंत प्रसाद महाराज यांनी सर्व भक्तांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी या दिंडीचे यजमान व आयोजक दिलीप देवळाणकर सुनेत्रा देवळांकर यांच्या हस्ते महाराजांच्या पाद्यपूजेंचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी वरद देवळांकर ,प्रथमेश देवळांकर, डंबाळे सर , ओमप्रकाश जैस्वाल,गौरव पाठक, प्रवीण मोडे, नंदू वैद्य, संजय देवलांकर,विजू कुलकर्णी , डॉ दिपक पाडळकर प्रकाश देवा जोशी, नंदू पिंपळवाडकर प्रशांत कुलकर्णी, दत्ता राऊत, नागे, अनुराग डंबाळे, राजू वैद्य, दीपक डांगरे, संजय जोशी, हेमराज जोशी,नंदू पगारे, आदींची मोठ्या संख्येने भाविक भक्तांची यांची उपस्थिती होती.

# वेलस्पेन फाउंडेशन संस्थेमार्फत मंगरूळमध्ये शेतकरी मेळावा साजरा



सिल्लोड प्रतिनिधी : आज दिनांक २५/६/२०२५/वेलस्पन फाउंडेशन फॉर हेल्थ अँड नॉलेज आणि राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगरूळ या गावात पीएम प्रणाम प्रशिक्षण व जागृती या विषयी शेतकरी कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली या कार्यशाळेचा मातीचे आरोग्य पोषण तत्त्वाचं व्यवस्थापन किड नियंत्रण आणि खताच्या खर्चात बचत करणे त्यामध्ये जैविक बुरशीनाशक ट्राकोड्रमा, पी एस बी के एस बी या जिवाणू संवर्धक खताचा वापर या विषयी चर्चा करण्यात आली .

यामध्ये वेलस्पन फाऊंडेशनचे पी यू मॅनेजर चंद्रशेखर जिकार सर यांनी शेतकऱ्यांना कपाशीवरील कीड व रोग व्यवस्थापन तसेच गुलाबी बोंड अळी नियंत्रण या विषयी शेतकऱ्यांना सखोल माहिती देण्यात आली तसेच आर सी एफ चे अधिकारी संजय सिंग सर यांनी खत व्यवस्थापन तसेच जमिनीचा सेंद्रिय कर्ब टिकवण्यासाठी सेंद्रिय खते वापरण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती संजयसिंग सर . चंद्रशेखर जिकार सर.आशिष भोरे सरपंच निवृत्ती वरपे व स्वयं शिक्षण संस्था सौ.वंदना ताई मरकडे तसेच वेलस्पन फाऊंडेशन टीम व गावातील शेकडो महिला व शेतकरी कार्यक्रमाला हजर होते

## राज्यस्तरीय पुरोहित प्रशिक्षण शिबिराचा समारोप आज

छत्रपती संभाजीनगर - दिनांक १७ जून पासून अडगाव जिल्हा संभाजीनगर येथे सुरु झालेल्या राज्यस्तरीय पुरोहित प्रशिक्षण वर्गाचा समारोप शुक्रवार दिनांक २७ जून रोजी सकाळी ११ वाजता सिडको एन १ मधील भक्ती गणेश मंदिरात संपन्न होणार असून या समारोप कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून एलोरा नॅचरल सीड्स से एम.डी प्रसिद्ध उद्योगपती श्री. किशोरजी वीर आणि अखिल भारतीय पुरोहित महासंघाचे महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष वेदशास्त्र संपन्न श्री. मुकुंदराव खोचे व प्रमुख वक्ते म्हणून मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे उपस्थित राहणार आहेत. समारोप कार्यक्रमात विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत अध्यक्ष संजय आप्पा बारगजे व मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्क राजीव जहागीरदार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या समारोप कार्यक्रमाला मोठ्या संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत सह संपर्कप्रमुख आनंदीदास राहटीकर आणि केशव माधव चतुर्वेद पाठशाळा अध्यक्ष लक्ष्मण माने यांनी केले आहे.

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. औरंगाबाद फोन:-०२४३५-२२१०२४**

जा.क्र. २०२५/जमा-२/कुळ/कावी/ ९०१ दिनांक ०४.०६.२०२५

**जाहिर प्रगटन**

सर्व ग्रामस्थ मौजे शफेपुर ता. कन्नड जि. औरंगाबाद यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री सुनंदाबाई लक्ष्मण मोकासे व ईतर रा शफेपुर ह.मु पडेगाव छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे शफेपुर गट नं ३५८ मधील क्षेत्र ०.७२ आर जमीन विक्री परवानगी मिळणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे, मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

तहसिलदार कन्नड

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ३१०/२०२५

अर्जदार : आन्ना कारभारी गायकवाड, वय. ५५ वर्षे, धंदा, मजुरी रा. डोमेगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण -वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी अ‍ॅड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हा वरील ठिकाणचा रहीवासी असून अर्जदाराचे वडील नामे कारभारी सुदामा गायकवाड हे मौजे डोमेगांव ता. गंगापूर येथील रहिवाशी होते ते दिनांक १७/०६/२०२४ रोजी मौजे डोमेगांव ता. गंगापरू जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदाराची आई नामे अरूणाबाई कारभारी गायकवाड हया यापुर्वीच सालसन २००५ मध्ये मयत झालेली आहे. मयत कारभारी सुदामा गायकवाड व मयत अरूणाबाई कारभारी गायकवाड यांना अर्जदार हाच एकमेव कायदेशीर वारसदार असून अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत कारभारी सुदामा गायकवाड यांच्या मृत्यु पश्चात अर्जदारास शासकीय व निमाशसकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत कारभारी सुदामा गायकवाड यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकिट) ची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-१६/०५/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | सहायक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क. ४२४/२०२५

पु.ता. १४/०८/२०२०५

अर्जदार : साखराबाई बाबुराव लोणकर, वय. ८५ वर्षे, धंदा. शेती, रा. नेवरगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदाराने या न्यायालयात सक्सेशन प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, आशाबाई कडुबाळ सोनवणे ही अर्जदाराची विवाहीत मुलगी असून ती दि. १६/०९/२०२४ रोजी नेवरगांव ता. गंगापुर येथे मयत झाली असून तिचे पुर्वी तिचे पती कडुबाळ जनार्धन सोनवणे हे दि. ०४/०८/२०१८ रोजी पखोरा ता. गंगापूर येथे मयत झाले आहे आणि या दोघांचा एकमेव मुलगा नामे भुषन कडुबाळ सोनवणे हा दि. ०८/०६/२०१२ रोजी मयत झाला असून तो विद्यार्थी होता व अविवाहीत होता. मयत आशाबाई काडुबाळ सोनवणे यांच्या नावे भारतीय स्टेट बँक शाखा नेवरगांव ता. गंगापूर येथील बँक खाते क. ६२३७४५७१८६३ मध्ये रक्कम १६७३४/- रूपये जमा असुन सदरची रक्कम व पुढील व्याज प्राप्त करण्यासाठी अर्जदाराने सदर बँकेत संपर्क साधला असता बँकेने वारस प्रमाणपत्राचे मागणी केल्याने सदरचा अर्ज अर्जदारास करणे भाग पडले आहे. अर्जदार हिने तीच मयताची एकमेव वारस असल्याचे नमुद करून सक्सेशन प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदाराच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे सक्सेशन प्रमाणपत्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | सहायक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

**कार्यालय नगरपरिषद खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर**

Email Id:-khultabadcomc@gmail.com

Phone no-०२४३७२४९०७

जा.क्र.२०२५/नपखु/कावि/१०९९ दिनांक:-२६/०६/२०२५

**निविदा सुचना**

खुलताबाद नगरपरिषद, कार्यालयाकरिता लेखनसामग्री (स्टेशनरी) मागविणे व विहित नमुन्यातील नोंदवही छपाई इ. करुन घेणेकरिता पात्र व इच्छुक कंत्राटदारांकडुन निविदा मागवित आहे.

निविदा अर्ज व अधिक माहितीसाठी संपर्क दि.२७/०६/२०२५ ते ०३/०७/२०२५ सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत वरील पत्यावर सामान्य प्रशासन विभाग येथे उपलब्ध करण्यात येत आहे. दि.२६/०६/२०२५

स्वाक्षरी/-

मुख्याधिकारी

नगरपरिषद खुलताबाद

**कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली**

**जाहिर प्रगटण**

**प्रकरण :- गाळा हस्तांतरण करणे बाबत.**

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा एस.बि.आय. बैंक शेजारी , हिंगोली यांना कळविण्यात येते की, श्री. बाळासाहेब ग्यानबाराव राखुंडे, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील एस.बि.आय. बैंक शेजारी मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे पहीला मजल्यावरील गाळा क्र. १० ज्याची रुंदी पुर्व-पश्चिम १० फुट म्हणजेच ३.०४ मीटर व लांबी उत्तर-दक्षिण १५ फुट म्हणजेच ४.५७ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ १५० चौ. फुट ज्याची चतुःसिमा पुर्वेस गाळा क्रं १९, पश्चिमेस गाळा क्रे ११, दक्षिणेस गाळा क्रं ०९ उत्तरेस : कॉम्पलेक्स मधील मोकळी जागा वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्र. १० हा श्री. बाळासाहेब ग्यानबाराव राखुंडे, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून राहीलेल्या उर्वरीत (३१/०३/२०५०) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि.२४/०८/२०२० अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळ्याची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री विश्वासराव दगडुजी बांगर , रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (३१/०३/२०५०) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री विश्वासराव दगडुजी बांगर, रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव | सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

**जाहिर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९९/२०२५.

अर्जदार : १. प्रकाश संपत बोडखे, वय. ७४ वर्षे, धंदा. शेती, २. ऊमेश संपत बोडखे, वय. ४७ वर्षे, धंदा, शेती, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

-विरुध्द-

गैरअर्जदार - कोणीही नाही.

प्रकरण - वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी अ‍ॅड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत संपत शंकर बोडखे हे दि. ०५/०२/२०२४ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत संपत शंकर बोडखे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- २९/०७/२०२५.

आज दि. २५/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरून

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ४२५/२०२५ पुता. २९/०७/२५

अर्जदार: १. मंगल कल्याण ठेंगे, वय. ४९ वर्ष धंदा. शेती २. अमोल कल्याण ठेंगे, वय. २७ वर्ष धंदा. शेती ३. मयुरी कल्याण ठेंगे, वय. १४ वर्ष धंदा. शिक्षण करिता अ.पा.क. आई मंगल कल्याण ठेंगे सर्व रा. सोलेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

- विरूद्धः-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन अ‍ॅक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदार यांनी त्यांचे वकील अ‍ॅड. राधेशाम घनशाम पवार यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन अ‍ॅक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की, असे की, अर्जदार नं. १ यांचे पति तसेच अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे कल्याण भावराव ठेंगे हे दि. ०४/०३/२०२५ रोजी मौजे सोलेगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहेत. तसेच मयत कल्याण भावराव ठेंगे यांची आई नामे परिगाबाई भावराव ठेंगे ही देखील मयत कल्याण भावराव ठेंगे हे लहाण असतांनाच मयत झाली असल्याने अर्जदार हे मयत कल्याण भावराव ठेंगे यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत कल्याण भावराव ठेंगे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत कल्याण भावराव ठेंगे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुट्टीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत कल्याण भावराव ठेंगे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | सहायक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ११५/२०२५

अर्जदार : १) रामनाथ हरीभाऊ पवार, वय. ४४ वर्षे, धंदा, मजुरी, रा. जयसिंगनगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) संगीता लक्ष्मण पवार, वय. ४९ वर्षे, धंदा, मजुरी, रा. जयसिंगनगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) मनोज लक्ष्मण पवार, वय २६ वर्षे, धंदा, मजुरी रा. जयसिंगनगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) दुर्गा सचिन गवारे, वय. २२ वर्षे, धंदा, मजुरी,, रा. जयभवानी नगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी अ‍ॅड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे वडील व अर्जदार क. २ चे सासरे तसेच अर्जदार क. ३ व ४ चे आजोबा नामे हरीभाऊ धोंडीराम पवार हे गंगापूर ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. २२/०५/२०२२ रोजी जयसिंगनगर, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत तसेच, अर्जदार क. १ ची आई व अर्जदार क. २ ची सासु तसेच अर्जदार क. ३ व ४ ची आजी नामे पद्माबाई हरीभाऊ पवार हया जयसिंग नगर गंगापूर ता. गंगापूर येथील रहीवासी होत्या व त्या २० वर्षापुर्वी मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार क. १ चा भाउ व अर्जदार क. २ चे पती व अर्जदार क. ३ व ४ चे वडील नामे लक्ष्मण हरीभाउ पवार हे जयसिंगनगर गंगापूर येथील रहीवासी होते व ते दि. ३०/०५/२००५ रोजी गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार क. १ ते ४ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे हरीभाऊ धोंडीराम पवार यांना अर्जदार क. १ ते ४ हे एकमेव कायदेशीर वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयतांच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : १६/०५/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | सहायक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## अग्रलेख...

# असून खोळंबा...

आजच्या डिजिटल युगात सरकार विविध क्षेत्रांत तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. विविध विभागांना आणि नागरिकांना त्याचा फायदाही होत आहे. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' ही ओरड त्यामुळे इतिहासजमा झाली आहे. त्याच योजनेचा पुढचा भाग म्हणजे राज्य परिवहन विभागामार्फत सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसवण्याची सुरू केलेली मोहीम. या उपक्रमाचा उद्देश वाहनांची ओळख निश्चित करणे, चोरी रोखणे आणि वाहनधारकांचे संरक्षण सुनिश्चित करणे हा आहे. परंतु या मोहिमेला गालबोट लागले आहे, कारण अनेक नागरिकांची बनावट संकेतस्थळांच्या जाळ्यात अडकून मोठी फसवणूक होत आहे. यामुळे वाहनधारकांचे पैसेही वाया जात असून, त्यांच्या हाती नंबर प्लेट येणेही दुरापास्त झाले आहे. संकेतस्थळावरील नोंदणीमध्येही घोळ होत आहेत. कुणाकडून कमी तर कुणाकडून जादा पैसे आकारले जात आहेत. अनेकदा संकेतस्थळ उघडण्यामध्ये अडचणी येत असून, विभागाच्या संकेतस्थळाशी समानता असलेल्या संकेतस्थळांवर चुकीनेही गेलात तर मोठा आर्थिक फटका बसत आहे. राज्य सरकार सायबर सिक्युरिटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करीत असताना बनावट संकेतस्थळांमुळे सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक ही गंभीर बाब आहे. यामुळे केवळ आर्थिक नुकसानच होत नसून नागरिकांचा सरकारी यंत्रणेवरील विश्वासही ढासळतो आहे.

राज्यात १ एप्रिलपासून सर्व वाहनांना एचएसआरपी नंबर बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिक सध्या यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करीत आहेत. पण याचाच गैरफायदा सायबर भामटे घेत आहेत. सायबर चोरट्यांनी ६ बनावट वेबसाईट तयार केल्या असून, नंबरप्लेट नोंदणीच्या नावाखाली ते नागरिकांना गंडा घालत आहेत. सरकारने या बनावट वेबसाईट्सपासून सावधान राहण्याचे आवाहन केले आहे, पण तितक्याने लोकांना दिलासा थोडाच मिळणार आहे. बनावट संकेतस्थळांचा सुळसुळाट झाला असून, या वेबसाईट्स अधिकृत संकेतस्थळाची हुबेहूब नक्कल करीत असल्याने सामान्य नागरिकच नव्हे तर टेक्नोसॅव्ही म्हणवून घेणाऱ्या पिढीतील लोकही त्यात अलगद अडकत आहेत. या संकेतस्थळांवर नोंदणी केल्यावर वाहनधारकांच्या खात्यातून पैसे तर वळते होतात, पण नंबर प्लेट वेळेवर पोहोचत नाही किंवा मिळतच नाही.

या बाबत कानोसा घेतला असताना जनतेमध्ये परिवहन विभागाच्या अधिकृत वेबसाईटबाबत माहितीचा अभाव असल्याची बाब पुढे येत आहे. कोणती वेबसाईट खरी आणि अधिकृत, याबाबत बरेच नागरिक अनभिज्ञ दिसतात. लोकांमध्ये तंत्रज्ञानाबाबत नसलेली जागृती हे देखील यामागचे एक कारण आहे. त्यामुळे अनेकदा गूगल सर्चवर येणाऱ्या पहिल्या लिंकवर क्लिक करून नागरिक फसवणुकीच्या विळख्यात अडकत असल्याच्या तक्रारी येत आहेत. काहींनी याबाबत माध्यमांमध्येही धाव घेतली आहे. असमान दर आकारणीच्या समस्येचाही नागरिकांना फटका बसत आहे. यासाठीचे दर निश्चित असतानाही, जादा पैसे घेऊन नागरिकांची लूट होते आहे. अधिकृत संकेतस्थळ वारंवार डाऊन होणे किंवा लोड न होणे, त्यामुळे नागरिक बनावट संकेतस्थळांच्या पर्यायांकडे वळत असल्याचे दिसत आहे. एचएसआरपीसाठीची मुदत सरकारने ३१ मार्च आणि नंतर ३० जूनपर्यंत वाढवून दिली होती. पण सहा महिन्यांचा कालावधी लोटूनही यो योजनेला मिळालेला अल्प प्रतिसाद आणि नोंदणीची संथगती बघता ही मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवून देण्यात आली आहे. नंबर प्लेट बसवून देणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी असून, यामध्ये तांत्रिक अडचणींनाही सामोरे जावे लागत आहे. उपराजधानी नागपूरचा विचार करता येथे २२ लाखांवर वाहनांना एचएसआरपी बसविण्याची गरज असताना आजतागायत २० टक्क्यांवरही हा आकडा गेलेला नाही. प्रशासनाने सांगितल्यानुसार वाहनधारकांना https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन 'अप्लाय एचएसआरपी'वर क्लिक करायचे आहे. झोनची निवड करून 'ऑर्डर एचएसआरपी'वर क्लिक केल्यानंतर वाहनाची माहिती टाकायची आहे. या प्रक्रियेनंतर जवळचे केंद्र निवडायचे आहे. ज्या तीन कंपन्यांना नंबरप्लेटचे कंत्राट मिळालेले आहे, त्यांनी राज्यात कुठेही नोंदणी शक्य असल्याचे सांगितले असले तरी, त्यात घोळ होत असून, नागरिकांचा उगाच खोळंबा होत आहे. विभागातील अधिकारीच सांगताहेत की त्यांच्याकडे दुचाकीसाठी ५३१ रुपयांऐवजी ९०० रुपये आकारल्याच्या तक्रारी आल्या आहेत. कारसाठी नागरिकांना १२०० रुपयांपेक्षा अधिक रुपये भरल्याच्याही तक्रारी आहेत. एचएसआरपीसाठी ऑनलाईन नोंदणी करताना इन्शुरन्स, पीयूसी आणि आरसी बूक अपडेट करावे लागणार का, याबाबत परिवहन विभागाने कुठलेही स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. पण दंडाची रक्कम वाचविण्यासाठी अनेक जण आरटीओ कार्यालयाच्या परिसरात चकरा मारताना दिसत आहेत. या परिस्थितीमुळे 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे ब्रीदवाक्य असलेल्या परिवहन विभागाच्या योजनेबद्दल 'असून खोळंबा' अशी स्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीत नागरिकांच्या मनात सरकारच्या मोहिमेबाबत नाराजी निर्माण झालेली आहे. सरकारला नागरिकांना दिलासाच द्यायचा असेल तर ही बनावट संकेतस्थळे कायमची बंद करायला हवीत. तशी यंत्रणा सरकारजवळ आहे. फक्त सरकारला त्या यंत्रणेचा वापर करण्याची इच्छाशक्ती हवी. राज्य परिवहन विभागाची जबाबदारी ही केवळ नंबर प्लेट लागू करण्यापुरती मर्यादित नाही. नागरिकांची फसवणूक होऊ नये याची पूर्ण काळजी घेणे ही देखील त्यांची जबाबदारी आहे. एकेका शहराची फसवणूक झालेल्या नागरिकांची आकडेवारी गोळा केली तर राज्यभरात ही संख्या हजारोंच्यावर जाईल. तथापि, सध्याच्या परिस्थितीत वादग्रस्त आणि बनावट संकेतस्थळांवर कार्यवाही करण्यात विभाग निष्क्रिय असल्याचे चित्र दिसते. ही निष्क्रियता फसवणुकीला प्रोत्साहन देणारी ठरत आहे.

सरकारने ताबडतोब या सायबर गुन्हेगारीला आळा घालून ती करणाऱ्या आरोपींना हुडकून काढायला हवे. बनावट संकेतस्थळांवर तत्काळ प्रतिबंध घालणे हा देखील उपाय असू शकतो. राज्य सायबर सुरक्षा यंत्रणांशी समन्वय करून बनावट संकेतस्थळे तत्काळ बंद केली जावीत. गुगल आणि अन्य सर्च इंजिन्सवर अशा संकेतस्थळांच्या जाहिराती देखील बंद केल्या जाव्यात. राज्य सरकारने अधिकृत वेबसाईट्सचा प्रचार, प्रसार सर्वत्र करावा. वाहन तपासणी केंद्र, आरटीओ कार्यालय, पेट्रोल पंप, वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, सोशल मीडिया आदी सर्व माध्यमांतून जाहिराती देऊन जनजागरण करायल हवे. सध्या प्रत्येक मोबाईलच्या रिंगपाठोपाठ सायबर गुन्हेगारीपासून सावध राहण्याचे आवाहन करणारा संदेश दिला जातो. त्यातून बऱ्याच मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये जागृती आली आहे. यासोबतच पथनाट्यांच्या माध्यमातून अशा संकेतस्थळांबाबत सावध राहण्याचा संदेश दिला जाऊ शकतो. एचएसआरपीसाठी ठरावीक शुल्क आहे हे नागरिकांना सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व अधिकृत वेबसाईट्सवर, केंद्रांवर आणि पोलिस ठाण्यांमध्ये दरपत्रक लावले जावे. डिजिटल माध्यमातून साक्षरतेचा प्रचार केला जायला हवा. एचएसआरसी बुक कसे करावे? याविषयी व्हिडीओ ट्युटोरियल, स्टेप-बाय-स्टेप मार्गदर्शिका बनवून यूट्युब, व्हॉट्सअॅप व फेसबुकवर प्रसारित केली असली तरी त्या लिंकचा जास्तीत जास्त युवा वर्गात प्रचार, प्रसार झाल्यास त्याचे चांगले परिणाम समोर आल्याशियाय राहणार नाही. वाहन तपासणी केंद्रांवर क्यूआर कोड लावून नागरिकांना अधिकृत संकेतस्थळावर नेणारी सोपी प्रणाली निर्माण करावी. राज्य सरकार सध्या केंद्राच्या सोबतीने विकास कामे आणि कार्यक्षमतेमध्ये वेगाने अग्रेसर होत आहे. त्यातून लोककल्याणाचे स्वप्न देखील साकार होत आहे. मात्र सर्वसामान्यांच्या सायबर फसवणुकीमुळे शासनाच्या प्रतिमेला तडे जात आहेत. परिवहन विभागाच्या मंत्र्यांनी आपल्या विभागाची कार्यक्षमता सिद्ध करताना याकडेही बारकाईने लक्ष दिल्यास सरकारबाबत विनाकारण निर्माण होणारी अनास्था दूर होण्यास मदत होईल.


## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# क्वांटम कॉम्प्युटिंगची भन्नाट संकल्पना

संगणक म्हणजे काय याबाबतच्या कल्पना सतत बदलत आहेत. तीस वर्षांपूर्वी असलेली मेनफ्रेम संगणकाची क्षमता आता ५जी स्मार्टफोनमध्ये काही वर्षांत येईल. अनेक विकसक नवनवीन कल्पना राबवून व्यवसाय, जीवन, व्यापार, उद्योग, सरकारी कामकाज अशा अनेक बाबीत अभिनव प्रोग्राम्स/अॅप्स निर्माण करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात आपण वेगाने प्रगती करीत आहोत. एके काळी केवळ विज्ञानकथांमध्ये पाहिले जाणारे तंत्रज्ञान आता प्रत्यक्षात येत आहे. आज आपण अशा एका तंत्रयुगात आहोत जिथे संगणक प्रणालीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. पारंपरिक संगणक अनेक समस्यांवर कार्यक्षमतेने उपाय शोधतो, परंतु काही गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी आणखी उच्च क्षमता आवश्यक आहे. अशा परिस्थितीत क्वांटम कॉम्प्युटिंग ही एक क्रांतिकारी संकल्पना म्हणून उदयास आली आहे. ही संगणक प्रणाली क्वांटम भौतिकशास्त्रावर आधारित आहे आणि पारंपरिक संगणकांपेक्षा लाखोपट वेगवान आणि कार्यक्षम ठरू शकते. कालचे सुपर कॉम्प्युटर आता नवीन स्वरूपात येत आहेत. त्याचेच नवीन नाव आहे क्वांटम कॉम्प्युटिंग. हे एक वेगाने उदयाला येणारे तंत्रज्ञान आहे. ते शास्त्रीय संगणकांसाठी अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी क्वांटम मेकॅनिक्सच्या नियमांचा उपयोग करते. ही यंत्रे अर्ध्या शतकाहून अधिक काळ चालत आलेल्या शास्त्रीय संगणकांपेक्षा खूप वेगळी आहेत. क्वांटम संगणकाची संकल्पना सर्व प्रथम १९८२ मध्ये नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्र रिचंड फेयनमॅन यांनी मांडली. ज्याप्रमाणे संगणकाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवले, त्याचप्रमाणे क्वांटम कॉम्प्युटिंग भविष्यात अनेक क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व बदल घडवण्याची क्षमता ठेवते.

हे तंत्रज्ञान केवळ पारंपरिक संगणकांच्या मर्यादा ओलांडून जटिल समस्या सोडवण्यास मदत करेल असे नाही, तर ते संशोधन, विकास आणि नवनवीन शोधांनाही चालना देईल. क्वांटम कॉम्प्युटर क्यूबिट्स वापरतात. क्यूबिट्स क्वांटम यांत्रिकीच्या नियमांवर आधारित असतात आणि त्यांच्यामध्ये सुपरपोझिशन आणि एंटँगलमेंट या दोन महत्त्वाच्या संकल्पना असतात. एंटँगलमेंट म्हणजे दोन किंवा अधिक क्यूबिट्स अशा प्रकारे जोडले जातात की, एका क्यूबिटची स्थिती बदलल्यास दुसऱ्या क्यूबिटची स्थितीही तत्काळ बदलते. यामुळे अत्यंत जटिल समस्या सोडवण्यासाठी प्रचंड समांतर प्रक्रिया करणे शक्य होते. साधे उदाहरण म्हणजे जसे साधा संगणक एका वेळी एक पुस्तक वाचेल आणि मग दुसऱ्या पुस्तकाकडे वळेल, पण क्वांटम कॉम्प्युटर एकाच वेळी ग्रंथालयातील सगळी पुस्तके वाचायला घेईल. या क्वांटम नियमांमुळे क्वांटम कॉम्प्युटर



पारंपरिक संगणकांना लागणाऱ्या दशके किंवा शतकांच्या तुलनेत काही मिनिटांमध्ये किंवा सेकंदात अत्यंत गुंतागुंतीच्या गणिताच्या समस्या सोडवू शकतात. क्वांटम संगणक प्रणालीमुळे माहितीची देवाणघेवाण, साठवण, माहिती प्रक्रिया सुरक्षिततरीत्या करता येईल. यामुळे हॅकिंगसारखे प्रकार रोखता येतील. क्वांटम संगणकाच्या माध्यमातून अतिगुंतागुंतीचे गणिती सिद्धांत साठवले जाऊ शकतील. संगणकीय मॉडेलच्या आधारे वैद्यकीय आजारावरील कारणे शोधता येतील. क्वांटम कॉम्प्युटिंगची शक्ती वापरणाऱ्या संस्था जगातील काही मोठ्या समस्यांचे निराकरण करण्यात मदत करू शकतात आणि औषध संशोधनापासून जागतिक कृषी, संरक्षण आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करू शकतात. पर्यावरणक्षेत्रात हवामानात होणारे बदल टिपून त्यातील भूतकाळातील नियमांनुसार भविष्यातील निष्कर्ष म्हणजे हवामानाचे अंदाज काढणे महत्त्वाचे असते. त्यामुळे हे अंदाज जितके बरोबर येतील, तितकी मदत मानवजातीला होईल. चक्रीवादळ, अतिवृष्टी, भूकंप या नैसर्गिक आपत्तीला आपण अस्मानी संकट मानतो. त्यात दरवर्षी प्राणहानी व कोट्यवधी मालमत्तेचे नुकसानही होते. या ठिकाणी भविष्यातील क्वांटम संगणक खूप मदत करू शकतील. संगणकाचे सध्याचे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी, अतिउच्च संगणकीय संसाधने वापरतात. त्यासाठी प्रचंड मोठे विदा (डेटा) विश्लेषण करायची गरज असते. हे प्रकरण प्रचंड वेळखाऊ आणि खर्चीक आहे. क्वांटम कॉम्प्युटरमध्ये सध्याच्या कॉम्प्युटरच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी संगणकीय संसाधनांसह समस्या सोडवण्याची क्षमता आहे. यामुळे अधिक कार्यक्षम कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रोग्राम्स तयार होऊ शकतात, या तंत्राचे अनेक क्षेत्रांना दीर्घकालीन फायदे आहेत.

आरोग्यक्षेत्रात हे तंत्रज्ञान औषध शोध, जिनोमिक्स आणि वैयक्तिक आरोग्यसेवांना लक्षणीयरीत्या गती देऊ शकते. उत्पादन क्षेत्रासाठी ते पुरवठा साखळी व्यवस्थापन, खर्च कमी करणे आणि एकूण कार्यक्षमता सुधारणे हे उद्दिष्ट साध्य करू शकते. सध्या अनेक वाहनांवर जीपीएसद्वारे वाहन हालचाल व्यवस्थापन माहिती मिळवली जाते. अनेक सीसीटीव्ही कॅमेरे चलतचित्रे रेकॉर्ड करतात. पण, हे सर्व पाहणे आणि त्यावर निर्णय घेणे मानवाच्या क्षमतेबाहेरचे आहे. इथेच उच्च तंत्रज्ञानक्षम माहिती पृथक्करण महत्त्वाचे आहे. माहितीचे तत्काळ पृथक्करण हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया आहे. ही माहिती अनेक स्वरूपात असू शकते. २०२३ मध्ये आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरू झाले. भारत एक नवीन झेप घेण्यासाठी आणि क्वांटम तंत्रज्ञानामध्ये जगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. राष्ट्रीय क्वांटम मिशनची आता निर्मिती करण्यात आली आहे. अशा प्रकारे मिशनच्या स्वरूपात क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी कार्यक्रम जाहीर करणारा भारत हा सातवा देश ठरला आहे. अमेरिका, चीन, कॅनडा, ऑस्ट्रिया, फिनलंड आणि फ्रान्स या देशांनी यापूर्वीच अशा मोहिमा सुरू केल्या आहेत. सुपरकंडक्टिंग आणि फोटोनिक तंत्रांसारख्या विविध प्लॅटफॉर्म्सवर आठ वर्षांमध्ये पन्नास ते एक हजार भौतिक क्यूबिट्स क्षमतेचा, मध्यम क्वांटम संगणक विकसित करणे हे नवीन मिशनचे उद्दिष्ट आहे. २०२३-२४ ते २०३०-३१ या आठ वर्षांच्या कालावधीत क्वांटम मिशनवर सहा हजार ६५ कोटी खर्च केले जातील. देशातील दोन हजार किलोमीटरच्या परिक्षेत्रातील ग्राऊंड स्टेशन्समधील उपग्रह आधारित सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, इतर देशांसोबत लांब पल्ल्याचे सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, दोन हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतराचे आंतरशहर क्वांटम नेटवर्क हे मिशनचे इतर पैलू आहेत. हे मिशन आण्विक यंत्रणा आणि अणुघड्याळांमध्ये उच्च संवेदनशीलतेसह सुसज्ज मॅग्नोमीटर विकसित करण्यात मदत करेल. क्वांटम उपकरणे तयार करण्यासाठी सुपरकंडक्टर, नवीन सेमीकंडक्टर आणि टोपोलॉजिकल सामग्रीच्या डिझाईनमध्येदेखील हे मदत करेल. मिशनअंतर्गत क्वांटम कॉम्प्युटिंग, क्वांटम कम्युनिकेशन, क्वांटम सेन्सिंग आणि मेट्रोलॉजी, क्वांटम सामग्री आणि उपकरणे या क्षेत्रात चार केंद्रे स्थापन केली जातील.

क्वांटम कॉम्प्युटिंग हे एक असे तंत्रज्ञान आहे, जे आपल्या भविष्याची दिशा बदलू शकते. हे केवळ वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचे प्रतीक नाही, तर मानवाच्या सर्वांत मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता असलेले एक शक्तिशाली साधन आहे. औषधनिर्माण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, हवामान बदल आणि सामग्री विज्ञान यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये ते क्रांती घडवून आणेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नीलेश जोशी

# समुपदेशकाची आत्महत्या

काही घटना समाजमन सुन्न करणाऱ्या असतात. त्यात कोणाचा आकस्मिक मृत्यू असतो, तर कुणी ध्यानीमनी नसताना केलेली आत्महत्या असते. त्यातही जो भावनिक आधार देतो, मनोचिकित्सा करून समुपदेशन करतो अशा व्यक्तीची आत्महत्या म्हणजे या समस्येने किती गंभीर रूप धारण केले आहे याची जाणीव करून देते. हा विषय पुन्हा चर्चेत आला तो अकोल्यातील मानसोपचार समुपदेशक असलेले डॉ. जावरकर यांच्या आत्महत्येने. गत २०-२२ वर्षांपासून डॉ. जावरकर हे अकोल्यातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञाकडे समुपदेशक म्हणून काम करीत होते. नेहमी सकारात्मक विचार मांडणारे, रुग्णांच्या समस्या समजून घेऊन त्यांना मानसिक आधार देणारे डॉक्टर यांनी स्वतःच आत्महत्या करावी इतक्या तणावात ते होते का असा प्रश्न चर्चिला जात आहे. खरं म्हणजे धक्कादायक ठरावी अशी ही काही पहिली आत्महत्या नव्हे. या पूर्वी देखील समाज प्रबोधन करणाऱ्या, प्रथितयश व्यक्तींनी केलेली आत्महत्या अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरली. त्यावेळी सुद्धा या विषयावर अनेकदा चर्चा झाली. प्रत्येक आत्महत्येची विविध कारणे असली तरी मनमोकळ्या संवादाचा अभाव ही प्रमुख बाब प्रत्येक घटनेनंतर समोर आली आहे.

'स्टुडंट सुसाईड - ऑन एपिडेमिक स्विपिंग इंडिया' यांनी मध्यंतरी नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीच्या आधारावर एक अहवाल प्रसारित केला होता. ज्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात धक्कादायक आकडेवारी समोर आली. या अहवालानुसार देशात २०२१ मध्ये एकूण तब्बल १ लाख ६४ हजार, तर २०२२ मध्ये १ लाख ७० हजार आत्महत्या झाल्याचे म्हटले. तर याच अहवालात ६ हजार ६५४ वरून १३ हजार ४४ इतर वाढ विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. दुर्दैवाने सर्वाधिक आत्महत्येचे प्रमाण महाराष्ट्रात असल्याचे या अहवालात म्हटले आहे. एकीकडे शिक्षणाचे हब असणाऱ्या राजस्थान येथील कोटामधील आत्महत्या चर्चेत असल्या तरी या रांगेत राजस्थानचा १० क्रमांक आहे. तर याच अहवालाच्या आधारे भारतात सरासरी दररोज ४५० आत्महत्या होतात. ही आकडेवारी चिंताजनक म्हणावी लागेल. त्यातही अनेक घटना पोलिस दप्तरी नोंद होत नसल्याने ती संख्या या अहवालात नाही.

आत्महत्येच्या घटनांमागे त्या व्यक्तीला आलेले अपयश, नकारात्मक विचार, अथवा मृत्यूचे भय असल्याचे बोलले जाते. पण शेवटी आत्महत्या ही एक कृती आहे. त्यात केवळ एका व्यक्तीचाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचा बळी जातो. त्यामुळे आत्महत्या रोखण्यासाठी विशेष प्रयत्न झाले पाहिजे. यात मुख्यतः मानसिक आरोग्याबाबतची काळजी आवश्यक आहे. एखादी व्यक्ती आत्महत्येबाबत बोलत असेल किंवा कुणाजवळ व्यक्त होत असेल तर त्या व्यक्तीचे म्हणणे गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. नैराश्याचे चिन्ह ओळखणे आणि वेळीच हस्तक्षेप करणे महत्त्वाचे आहे. तर एखाद्या व्यक्तीच्या वागणुकीत बदल आढळल्यास त्याच्याशी मनमोकळा संवाद साधून त्याच्या मनात काही वाईट विचार तर नाहीत ना याची विचारणा करायला हवी.

मानसोपचार तज्ज्ञांच्या मते अनेकदा असे दिसून येते की, त्या व्यक्तीला त्याच्याबद्दल सहानुभूती प्रेम असणाऱ्याची गरज असते. ज्याच्याजवळ तो मनमोकळा संवाद साधू शकतो. स्वाभाविकच संवादातून मार्ग निघून आत्महत्या टळल्याची अनेक उदारणे आहेत. मुळात आत्महत्येसारखा वाईट विचार मनात आल्यानंतर संवादाच्या अभावाने त्याचे कृतीत रूपांतर होत असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. भारतीय संस्कृतीत कुटुंब हे संवादाचे सर्वांत सशक्त माध्यम म्हटले जाते. पण गत काही वर्षांमध्ये ढासळत असलेल्या कुटुंब व्यवस्थेमुळे अनेक गंभीर समस्या समोर येत आहेत. संयुक्त कुटुंब पद्धतीत एकाच घरात समवयस्क असलेली ८-१० मुले-मुली यांचे बहीण-भावाचे घट्ट नाते तर असायचेच त्यापेक्षाही अधिक त्यांची मैत्री असायची. दुर्दैवाने ही व्यवस्था कमकुवत झाल्याने नात्यातील घट्टपणा आणि मैत्रीतील ओलावा या दोन्हीही बाबींना आज ही पिढी मुकली आहे.

स्वाभाविकच कुटुंबातच होणारा मोकळा मैत्रीपूर्ण संवाद देखील थांबला. समाजात देखील सतत वाढत असलेल्या स्पर्धेतून आणि भौतिक सुखाच्या हव्यासातून निरपेक्ष मित्रांची संख्या कमी होत असल्याचे चित्र आहे. म्हणूनच विविध समस्या बळावत आहेत. ज्या दिवशी कुटुंबातील संवाद वाढेल, निरपेक्ष प्रेम करणाऱ्या मित्रांची संख्या वाढेल त्या दिवशी आत्महत्येसारखा वाईट विचार कुणाच्याही मनाला शिवणार नाही.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# लालूप्रसाद पुन्हा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष

बिहारचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांची राजदच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी तेराव्यांदा अविरोध निवड झाली. हा एक विक्रम म्हटला पाहिजे. लालूप्रसादांनी राजकारणात असे अनेक विक्रम केले आहेत. चारा घोटाळ्यात तुरुंगात जायची वेळ आल्यावर पत्नी राबडीदेवीच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घालणे, हा असाच एक विक्रम होता. १९९७ मध्ये लालूप्रसादांनी जनता दलातून बाहेर पडत राष्ट्रीय जनता दलाची स्थापना केली. तेव्हापासून म्हणजे तब्बल २८ वर्षांपासून राजदचे अध्यक्षपद त्यांच्याकडेच आहे. घराणेशाही असलेल्या पक्षात यापेक्षा वेगळे काही होणे अपेक्षितही नसते.

५ जुलैला पाटण्यात होणाऱ्या राजद राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनात ७८ वर्षीय लालूप्रसाद अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. यावर्षाअखेर बिहार विधानसभेची निवडणूक होणार असल्यामुळे या निवडीला महत्त्व आले आहे. राजदच्या नावातील पहिले अक्षर राष्ट्रीय असले, तरी तो पूर्णपणे प्रादेशिक पक्ष आहे. बिहार आणि काही प्रमाणात झारखंडमध्ये या पक्षाचे अस्तित्व आहे. लालूप्रसाद म्हटले की, सर्वांना बिहारमधील बहुचर्चित चारा घोटाळ्याची आठवण येते. चारा घोटाळ्यात लालूप्रसादांना तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे. सध्या ते प्रकृतीच्या कारणावरून जामिनावर बाहेर आहेत. गेल्या काही महिन्यांपासून लालूप्रसाद यांचे कुटुंब वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आहे. लालूप्रसादांनी आपले ज्येष्ठ पुत्र तेजप्रताप यादव यांची पक्षविरोधी कारवाया केल्याच्या आरोपावरून पक्षातून आणि कुटुंबातूनही हकालपट्टी केली. आता तेजप्रताप यादव आपल्या जिवाला धोका असल्याचा आरोप करीत आहेत. तेजप्रतापांचा इशारा लालूप्रसाद आणि तेजस्वी यादव यांच्या काही निकटवर्तीयांवर आहे. बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राजदने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. त्यामुळे पक्षातील सतासंतुलन राखण्यासाठी तसेच तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदावर विराजमान करण्यासाठी लालूप्रसादांनी पुन्हा एकदा पक्षाची सूत्रे आपल्याकडे घेतली आहेत. लालूप्रसादांची तब्येत आता पहिलेसारखी राहिलेली नाही. राजदच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी ते राज्यात किती दौरे करू शकतील, याबाबतही साशंकता आहे. तरीसुद्धा लालूप्रसादांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वतःकडे घेतले आहे, नव्हे त्यांना ते स्वतःकडे घ्यावे लागले. तसे केले नसते तर राजदमध्ये फूट पडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

२५ जून १९७५ ला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणिबाणी लागू केली होती. आणिबाणीत मिसाचा कायदा लागू करण्यात आला होता. आणिबाणीचे स्मरण म्हणून मिसा काळात झालेल्या आपल्या पहिल्या कन्येचे नाव लालूप्रसादांनी 'मिसादेवी' असे ठेवले होते. या मिसादेवी आता राज्यसभेच्या सदस्य आहेत. १९७५ मध्ये लागू झालेल्या आणिबाणीला नुकतीच ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. तेजस्वी यादवला राजदने पहिल्यांदाच मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले असे नाही. याआधी २०२० च्या विधानसभा निवडणुकीतही राजदने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. राजदच्या प्रचारात लालूप्रसाद यादव आणि त्यांच्या पत्नी तसेच राज्याच्या माजी मुख्यमंत्री राबडीदेवी यांची छायाचित्रे वापरण्यात आली होती. निवडणुकीच्या प्रचारात भाजपा आणि जनता दल संयुक्तने लालू आणि राबडीदेवी यांच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करीत तेजस्वी यादववर जोरदार हल्ला चढवला होता. हा मुद्दा आपल्याला अडचणीत आणणार, हे लक्षात आल्यानंतर तेजस्वी यादव यांना प्रचारातून लालूप्रसाद आणि राबडीदेवी यांची छायाचित्रे हटवण्याचा निर्णय घ्यावा लागला होता. मात्र त्याचा काही फायदा झाला नाही. राजदला निवडणुकीत बहुमत मिळाले नाही आणि मुख्यमंत्रिपदाने तेजस्वी यादव यांना पुन्हा हुलकावणी दिली. बिहारचे राजकारण देशात सर्वांत बेभरवशाचे आहे. येथील राजकारणात मित्र आणि शत्रू यांची समीकरणे इतक्या वेगात बदलतात की, लोकांना विचार करायलाही वेळ मिळत नाही. बिहारमध्ये सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेल्या नितीशकुमार यांनी एकदा नाही तर दोनदा भाजपाची साथ सोडून राजदसोबत आघाडी करत राज्यात सरकार स्थापन केले होते. या सरकारमध्ये नितीशकुमार मुख्यमंत्री तर तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री झाले होते. मानसिक आरोग्य चांगले नसलेले लालूप्रसादांचे दुसरे पुत्र तेजप्रताप यादवही या मंत्रिमंडळात आरोग्यमंत्री होते.

त्यावेळी बिहारच्या राजकारणात ही चाचा-भतिजाची जोडी खूप चर्चेत होती. नितीशकुमार यांना राष्ट्रीय राजकारणात जाण्याची आणि पंतप्रधान होण्याची स्वप्नेही पडू लागली होती. बिहारच्या राजकारणातून बाहेर पडत राष्ट्रीय राजकारणात जाण्याची आणि तेजस्वी यादव यांच्या हातात बिहारची सूत्रे देण्याची घोषणाही नितीशकुमार यांनी तेव्हा करून टाकली होती. त्यावेळी या घोषणेला जदयुतूनच विरोध झाला होता. शरद पवारांच्या राजकारणासारखे बिहारमध्ये नितीशकुमारांचे आहे. त्यामुळे तेजस्वी यादवला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करून काही महिने होत नाही, तोच नितीशकुमार यांनी कोलांटउडी मारत राजदला सत्तेपासून वंचित केले आणि भाजपाच्या पाठिंब्याने राज्यात पुन्हा सरकार स्थापन केले. नितीशकुमारांनी धोका दिल्यामुळे लालूप्रसाद संतप्त झाले. यावेळी काही झाले तरी तेजस्वीला मुख्यमंत्री करण्याच्या निर्धाराने नव्या दमाने राजकारणात सक्रिय होण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि त्यासाठीच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वतःकडे घेतले. तेराव्यांदा पक्षाचे अध्यक्ष झाल्यामुळे राजदच्या अध्यक्षपदाची तेरवी लालूप्रसादांकडे आली, असे म्हणायला हरकत नाही. आता लालूप्रसाद बिहारच्या राजकारणात काही चमत्कार करू शकतील का, तेजस्वीला मुख्यमंत्रिपदावर बसवू शकतील का? या प्रश्नांच्या उत्तरासाठी आपल्याला आधी बिहार विधानसभेची निवडणूक होऊ द्यावी लागेल.

बिहार विधानसभेची निवडणूक भाजपा नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलासोबत लढवणार आहे. चिराग पासवान यांचा जनशक्ती पक्षही रालोआसोबत आहे. दुसरीकडे राजद आणि काँग्रेस आघाडी निवडणुकीच्या रिंगणात राहणार आहे. एकेकाळी बिहारच्याच नाही तर राष्ट्रीय राजकारणातही लालूप्रसादांचा प्रभाव होता. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील संपुआच्या पहिल्या मंत्रिमंडळात पाच वर्षे त्यांनी रेल्वेमंत्रिपद भूषविले होते. पण आता राष्ट्रीय राजकारणातून लालूप्रसादांचा प्रभाव पूर्णपणे ओसरला असला, तरी बिहारच्या राजकारणात तो काही प्रमाणात कायम आहे. त्यामुळे आपली परंपरागत व्होट बँक असलेल्या मुस्लिम आणि यादव समाजाला संदेश देण्यासाठी तसेच तेजस्वी यादवच्या बाजूने वातावरण निर्मिती करण्यासाठी लालूप्रसादांनी स्वतःची शारीरिक आणि मानसिक स्थिती चांगली नसतानाही राजदचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वतःकडे घेतले आहे. याचा कितपत परिणाम होतो, हे विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

९८८१७१७८१७

## हिट अॅण्ड रन : नागपुरातील लोकांना झाले तरी काय?

नुकतेच वृत्तपत्रामध्ये वाचण्यात आले की, काही दिवसांपूर्वी रात्री सुभाषनगर जवळील श्री गजानन महाराज मंदिराजवळ एका एक काळ्या रंगाच्या कारने मजुराला चिरडले. कारचालक फरार. पोलिस तपास सुरू आहे. असाच एक प्रसंग सुमारे दोन महिन्यांपूर्वी प्रतापनगर दुर्गा मंदिराजवळ, मेन रोडवर भर दिवसा घडला. स्कूटरने जाणाऱ्या एका वयस्कर महिलेला कारचालकाने धडक दिली आणि पळून गेला. खरे तर हा रहरदरीचा रस्ता, परंतु बघे बघतच राहिले. असंवेदनशीलता, दुसरे काय? तिचे मेजर ऑपरेशन करावे लागले. सीसीटीव्ही फुटेज अजूनही मिळत नाही. या रस्त्यावरील बहुतांश दुकानात सीसीटीव्ही आहेत. कशातच घटना कैद होत नाही. पोलिस तरी काय करणार? एखादा माणूस हेल्मेट घालून नसला की कसे सीसीटीव्हीमध्ये येते आणि अशा घटनांच्या वेळी मात्र सीसीटीव्ही काहीच कामाचा नाही, हे कसे? तसेच नागपुरात सिग्नल तोडून पळणाऱ्यांनी उच्छाद मांडला आहे. कदाचित हीच मंडळी हिट अॅण्ड रनसाठी कारणीभूत असतील. या वाईट वृत्तीला आळा घातलाच पाहिजे. प्रत्येक चौकात ट्रॅफिक पोलिस नसणे हेही अतिशय गंभीर आहे. वरील दोन्ही हिट अॅण्ड रन प्रकरणामधील कार आणि चालक सापडलेच पाहिजे आणि या घटनांना आळा घालण्यासाठी जनआंदोलनाची गरज आहे.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

●● ●●

## आणिबाणीतील संघ स्वयंसेवकांचे योगदान

दि. २५ जूनच्या तरुण भारतात रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह हो. वे. शेषाद्री यांच्या विचारपुष्पात संघ स्वयंसेवक व त्यांच्या कुटुंबीयांच्या आणिबाणीतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. अटक न झालेले स्वयंसेवक व त्यांच्या कुटुंबीयांना त्याकाळात काम करताना अनेक अडचणी येत होत्या. अनेकजण त्यांना टाळत होते. अपमानही होत होता. भूमिगत काम करताना पैसाही खर्च करावा लागत असे. तसेच काही सरकारी कर्मचाऱ्यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. उदा. तत्कालीन डी. वाय. एस. पी. श्री द्रविड, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. मारवाह या सर्वांच्या योगदानाचा आणिबाणीविरुद्ध लढ्यात महत्त्वपूर्ण वाटा आहे. निरपेक्ष देशभक्तीचे हे उदाहरण म्हणता येईल.

**डॉ. आनंद फडके**/९४२२१०८३८२

●● ●●

## वाचक पत्रे

## लाडकी बहीण योजनेतील आर्थिक अडथळे दूर व्हावे

महाराष्ट्रात गेल्या अकरा महिन्यांपासून लाडक्या बहिणींची चर्चा होत आहे. निमित्त होते राज्यातील विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा. विधानसभा निवडणुकीआधी महायुतीने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि त्याची अंमलबजावणी सुरू केली. दर महिन्याला दीड हजार रुपये पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमाही होत आहेत. परंतु ऐन निवडणुकीच्या काळात दीड हजार रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा महायुतीच्या नेत्यांनी केली, तर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी थेट तीन हजार रुपये लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमा करणार असे सांगितले. महाविकास आघाडीला लाडक्या बहिणींनी नाकारले. परंतु लाडक्या बहिणी महायुतीसाठी गेमचेंजर ठरल्या. राज्यात महायुतीला सत्ता स्थापनेचा बहुमान मिळाला. मात्र विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्याची वेळ आली तेव्हा कळले राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे. दीड हजार रुपये देणे शक्य नाही तर २१०० रुपये कुठून द्यायचे, असा प्रश्न महायुतीच्याच नेत्यांना सतावू लागला. मात्र लाडक्या बहिणींसमोर मान खाली घालण्याची वेळ आल्याचे समजताच कसेबसे दीड हजार रुपये बहिणींच्या बँक खात्यात जमा केले जात आहेत. परंतु कधीपर्यंत लाडक्या बहिणींना पैसे द्यायचे, सगळ्याचे सोंग आणता येते पण पैशाचे नाही, हे महायुतीच्या लक्षात येताच पैशांची पळवापळवी सुरू झाल्याचे दिसते.

जुलै २०२२ पासून लाडक्या बहिणींचा मुद्दा राजकारणाचा भाग झाला आहे. लाडकी बहीण योजना बंद करण्याची घोषणा केली गेली, तर राज्यातील महिला व विरोधकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल अन् योजना सुरूच ठेवायची झाली, तर पैशांची जमवाजमव कुठून करायची. धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय अशी बिकट अवस्था झाली आहे. अलिकडेच अजित पवार गटाचे नेते तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी २१०० रुपये पात्र महिलांना देणार असे कोणी म्हटले नाही, असा घूमजाव केला होता. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगला आहे. सत्तेत कोणी असो, ज्यांच्या मतांवर निवडून आलो त्यांचे आपण काहीतरी देणे लागतो याचा विचार आतातरी सर्वपक्षीय नेत्यांनी करणे गरजेचे आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# हिंगोलीत दमदार पावसाने पिकांना जीवदान, शेतकऱ्यांमध्ये समाधान

## जिल्ह्यात ३० पैकी १० मंडळात अतिवृष्टी, उर्वरित पेरण्यांना सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जून**
जिल्ह्यात मागील चोवीस तासापेक्षा जास्त कालावधीपासून सर्वदूर दमदार पावसाने हजेरी लावली असून या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले असून शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. जिल्ह्यातील ३० मंडळापैकी १० मंडळात अतिवृष्टी झाली आहे. तसेच दमदार पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना आता पेरणी करता येणार आहे.

दि २५ जूनच्या सायंकाळपासून जिल्ह्यात हलका ते मध्यमस्वरूपाचा पावसाला सुरूवात झाली. दि २६ जूनच्या सायंकाळपर्यंत पावसाची रिपरिप सुरूच होती. जिल्ह्यात यावर्षी खरीप हंगामात ३.५० लाख हेक्टर क्षेत्रात पेरणीचा अंदाज होता. मात्र जून महिन्याच्या सुरूवातीला झालेल्या पावसामुळे जिल्ह्यात ५० टक्केच शेतकऱ्यांनी पेरणी केली होती. उर्वरित शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत होते.

पेरणी केल्यानंतर मागील पंधरा ते वीस दिवसांपासून पावसाने दडी मारली. त्यामुळे सोयाबीनसह इतर पिकांनी माना टाकण्यास सुरूवात केली होती. ज्या शेतकऱ्यांकडे पाणी आहे त्यांनी तुषार सिंचन पध्दतीने पिकांना पाणी देण्यास सुरूवात केली होती परंतु कोरडवाहू शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. शेतकरी दमदार पावसाच्या प्रतिक्षेत होता.

अखेर दि २५ जून रोजी सायंकाळी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सर्वदूर पडायला सुरूवात झाली. या पावसामुळे खरीप पिकांना जीवदान मिळाले आहे. तर ज्याठिकाणी पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या होत्या त्या ठिकाणी आता पेरण्यांना वेग येणार आहे. शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी आधीच करून ठेवली होती. जिल्ह्यात मागील चोवीस तासात एकूण ४८.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये ३० पैकी १० मंडळात अतिवृष्टी झाली आहे. आखाडा बाळापूर ९४.३ मिमी, डोंगरगडा ७०.८ मिमी, वारंगा ६७.५ मिमी, वाकोडी ७८.५ मिमी, वसमत ६६ मिमी, आंबा ६६ मिमी, हयातनगर ६६मिमी, गिरगाव ६७ मिमी, टेंभूर्णी ६६ मिमी, कुरूंदा ७३.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

तालुकानिहाय पावसाची नोंद हिंगोली ४३.९ मिमी, कळमनुरी ७२.३ मिमी, वसमत ६०.४ मिमी, औंढा नागनाथ ३४.८ मिमी, सेनगाव २७.५ मिमी एवढा पाऊस पडला आहे. पावसामुळे वातावरणात थंडावा निर्माण झाला असून छोट्या नद्या, नाले, ओढे यांना पाणी आले असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटला आहे. दमदार पावसामुळे शेतकरी सुखावल्याचे चित्र दिसत आहे.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी करून नवीन पीककर्ज द्या

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ जून**
राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करून त्यांना नवीन पीक कर्ज देण्यात यावे यासह विविध मागण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून गुरुवार (दि.२६) जून रोजी दुपारी ३ वाजता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना औंढा नागनाथ तहसीलदार हरीश गाडे यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे.

शेतकऱ्याचे पूर्ण कर्ज माफ करून त्यांना नवीन पीक कर्ज देण्यात यावे, शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विमा ही योजना पुन्हा सुरू करावी,लाडक्या बहिणीला १५०० ऐवजी २१०० रुपये देण्यात यावे अशा मागण्या केल्या. सदरील निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष रमेशराव सानप यांच्या नेतृत्वाखाली तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव चव्हाण यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव चव्हाण, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनीष आखरे, तालुकाध्यक्ष रमेशराव सानप, तालुका उपाध्यक्ष संभाजी चव्हाण, तालुका सरचिटणीस विठ्ठलराव गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप राखोडे, सुरेशराव आहेर, शकील अहमद, वसंतराव राखोडे, चंद्रकांत सुतारे, विलास गायकवाड, प्रकाश गायकवाड, संतोष मोरगे, शामराव देशमुख बाळासाहेब मगर, ज्ञानेश्वर गीते, बालाजी हाके चंद्रकांत गायकवाड, गणपत राखोडे, पांडुरंग राखोडे कुंडलिक राखोडे, बालासाहेब मगर यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. यावेळी औंढा नागनाथ येथे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली.

# मराठवाडा जनता विकास परिषदेची नूतन कार्यकारणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जून**
पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या मार्गदर्शनात स्थापन झालेली व मराठवाड्यातील रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, रेल्वे, शेती, उद्योग अशा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या बिगर राजकीय संघटनेच्या मराठवाडा जनता विकास परिषदची हिंगोली जिल्हा कार्यकारणीची बैठक नुकतीच झाली असून असून परिषदेच्या जिल्हा नव्यानेच निवडण्यात आलेले जिल्हाध्यक्ष डॉ. रामदास धांडे तर सचिव दिलीप खोडके यांना माजी जिल्हाध्यक्ष विठ्ठल सोळंके यांनी कार्यभार हस्तांतरण केला.

डॉ. संजय नाकाडे यांच्या निवासस्थानी काल बुधवारी सायंकाळी झालेल्या बैठकीत हा सत्कार करण्यात आला. यावेळी केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य म्हणून विजय वाकडे, विठ्ठल सोळंके यांचे तर जिल्हा कार्यकारणीचे उपाध्यक्ष डॉ. संजय नाकाडे, सहसचिव रेणुकादास वैद्य, कोषाध्यक्ष अब्दुल रहीम, अभ्यास गटप्रमुख राकेश भट तर जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य म्हणून ॲडव्होकेट रामचंद्र बागल, व्हि.डी. देशमुख, कुंडलिकराव निर्मले, शुभम सोळंके आदींचे अभिनंदन करण्यात आले.

जिल्ह्यातील विविध विकास कामाकडे लक्ष घालून परिषदेचे कार्य जोमाने पुढे नेणार असल्याचे यावेळी नवीन जिल्हाध्यक्ष डॉ. रामदास धांडे यांनी सांगितले.



**हिंगोली– नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पोलिस मुख्यालयात व्यापारी, प्रतिष्ठीत नागरिक, पत्रकार आदींची बैठक पार पडली. या बैठकीत व्यापाऱ्यांची अनेक दिवसापासूनची मागणी दुकाने रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्याची परवानगी देण्यात यावी मान्य करण्यात आली. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन




**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १८ जून**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सहाय्यक आयुक्त समाज कल्याण हिंगोली च्या वतीने लोककल्याणकारी राजा राजर्षी शाहू महाराज यांची १५१ जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महामानव महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तानाजीराव मुटकुळे उपस्थित होते. प्रमुखअतिथी अतिरिक्त जिल्हाधिकारी कांबळे प्रादेशिक उपायुक्त श्रीमती छाया कुलाल सहायक संचालक यादव गायकवाड, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ गोवंदे, विशेष अधिकारी अमोल घुगे, आत्माराम वागतकर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून अंकेत जाधव –आयकर विभाग, अक्षय राठोड –असिस्टंट कमांडट यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण सहायक आयुक्त श्रीमती गीता गुठ्ठे यांनी केले.उपस्थित मान्यवरांचे भारतीय संविधानाच्या उद्देशिका फ्रेम व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. संविधान उद्देशिकेचे वाचनही सामूहिकरीत्या करण्यात आले.

प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त डॉ, वर्षा कुरील, प्रा. विक्रम जावळे, शांताबाई मोरे,बबन मोरे, नीटकॉन बार्टी सेंटर, रेनबोचे प्राचार्य विजय कांबळे, दिगंबर काळे, सरजू देवी विद्यालयाचे संजय घुमरे श्रीमती सोवीतकर आदीं उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातून प्रथम आलेल्या गुणवंत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार ५००० रु व ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ योजने अंतर्गत श्रीमती संगीता राजू राठोड यांना पाच लाख रुपयाचा सानुग्रह अनुदान प्रदान करण्यात आले. अंकित जाधव व अक्षय राठोड यांनी उपस्थित त्यांना स्पर्धा परीक्षा विषयी सखोल असे मार्गदर्शन केले. श्री कांबळे अप्पर जिल्हाधिकारी यांनी अध्यक्ष विचार व्यक्त केले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी गीते यांनी केले तर कार्यक्रमाचे शेवटी आभार श्रीमती वर्षा घुगे यांनी व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सामाजिक न्याय भवन परिसरात वृक्षारोपण हि करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सामाजिक न्याय विभागातील सर्व कर्मचारी व बार्टी समतादूत कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेख यासीर हबीब तांबट यांची युवक प्रदेश सचिवपदी निवड



**तभा वृत्त सेवा**
**वसमत, २६ जून**
तालुक्यातील उदयोन्मुख युवा नेतृत्व शेख यासीर हबीब तांबट यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या युवक प्रदेश सचिवपदी मुंबई येथे नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे वसमत तालुक्यासह शहरात आनंदाची लाट पसरली आहे. अजित दादा पवार यांच्या हस्ते वसमत विधानसभाचे आमदार राजू भैया नवघरे व पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. शेख यासीर हबीब हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून, युवकांमध्ये त्यांचा चांगला प्रभाव आहे. त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत अजित पवार गटाकडून त्यांना ही जबाबदारी सोपवण्यात आली. या निवडीनंतर शेख यासीर हबीब यांनी पक्षनेतृत्वाचे आभार मानत असे सांगितले की, युवकांच्या समस्या आणि अपेक्षांसाठी मी नेहमीच कटिबद्ध राहीन. पक्षाच्या धोरणानुसार गावागावात युवकांना संघटित करून काम करणार आहे. यावेळी वसमत विधानसभाचे आमदार राजू भैय्या नवघरे, जिल्हा अध्यक्ष बि डी बांगर, शहराध्यक्ष मुजिब पठाण, दीपक कातोरे, शेख मोबीन, सय्यद इमरान अली, आयफन चाऊस, हारून दालवाले व इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २६ जून**
शिवाजी महाविद्यालय येथे राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थिती राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील कांबळे, प्रा. आशिष इंगळे, प्रा. संजय चव्हाण,डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांच्यासह डॉ निवृत्ती हुरगुळे, डॉ. गणपत पवार, डॉ, इकबाल जावेद, डॉ. बप्पा जाधव, डॉ. रामदास मुकटे डॉ. संगीता मुंढे, डॉ. सुनंदा भुसारे, डॉ,मनीषा गवळी, डॉ. गुणाजी नलगे, प्रा. कैलास खंदारे, डॉ. सुखनदंन ढाले, प्रा. संदीप लोंढे प्रा. देवानंद येवले, प्रा. प्रकाश पिंजन, प्रा. तुकाराम चौतमल, प्रा. बळीराम शिंदे, प्रा. सतीश मोरे, प्रा. गिरीश घुगे प्रा, माणकेश्वर गलांडे, प्रा, शिवदास राऊत, प्रा. अनिल परसवाळे, प्रा. निलम काळे, प्रा. कैलास मांडगे, प्रा.प्रकाश पतंगे, विजय पवार, बंडू महाडिक सुभाष जरे यांची उपस्थिती होती.

# आणीबाणीच्या अनुषंगाने घटनांवर आधारीत विशेष प्रदर्शनीचे उद्घाटन



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २६ जून**
देशात दि. २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला आज बुधवार (दि.२५) रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने आज येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात दोन दिवशीय चित्रमय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते फीत कापून व दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी तहसीलदार श्रीकांत भुजबळ, हयात आणीबाणी धारक लक्ष्मीकांत शिरडकर, उपसंपादक चंद्रकांत कारभारी यांच्यासह हयात आणीबाणी धारक आणि त्यांचे वारस, नागरिक उपस्थित होते.

या प्रदर्शनात आणीबाणीच्या अनुषंगाने विविध घटना व घडामोडी, आणीबाणी विरोधी संघर्षात सहभागी झालेले विविध मान्यवरांची छायाचित्रे, तसेच छायाचित्रांसोबत अनुरुप व औचित्यपूर्ण असा मजकूर, आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्ष याची माहिती संक्षिप्त स्वरुपात दिली आहे. या प्रदर्शनामध्ये छायाचित्रांबरोबरच संक्षिप्त व माहितीपूर्ण मजकूर, घटनाक्रम, माहितीफलक यांची माहिती देण्यात आली आहे. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह विविध मान्यवर यांनी प्रदर्शनाची पाहणी केली.हे चित्रमय प्रदर्शन दि. २५ व २६ जून, २०२५ या दिवशी सर्व नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध असून, जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील योगदान दिलेल्या हयात आणीबाणीधारक आणि त्यांच्या वारसांना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आले. यावेळी कार्यक्रमात उपस्थित मान्यवर व नागरिकांना देशभक्तीपर माहितीचे चित्रफीत दाखवण्यात आली. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाचे कर्मचारी कैलास लांडगे, श्रीकांत देशमुख उपस्थित होते.

# उगम ग्राम विकास संस्थेत छत्रपती शाहू महाराज जयंती



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २६ जून–** उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी शाहू महाराज यांचे शिक्षण, समता, दुष्काळ, पर्यावरण विषयक केलेल्या कामाविषयी अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना सांगितले. छत्रपती शाहू महाराज पालकांनी विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्याची सक्ती केली व जे पालक मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्यांना मासिक एक रुपया दंड द्यावा लागत असे. विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचणी येऊ नये म्हणून वसतिगृह निर्माण केली, आरक्षण निर्माण केले. तसेच जातीयता निर्मूलन व्हावे म्हणून पुढाकार घेत. कोल्हापूर बंधारे ही शाहू महाराजांनी तयार केलेल्या बंधाऱ्यांची कॉपी असल्याचे पाईकराव यांनी सांगितले. यावेळी सुशिला पाईकराव, दिशांत पाईकराव, विकास कांबळे, शीतल कांबळे, राम खंदारे, ओंकार भालेराव, बालाजी मोरे व विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकरी, कष्टकरी वाऱ्यावर सोडून सत्ताधाऱ्यांकडून शाही मेजवानीवर कोट्यवधीची रुपयांची उधळपट्टी

## जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांची सरकारवर सडकून टीका

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

राज्यातील शेतकरी, कष्टकऱ्यांसह बेरोजगार युवकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत त्यांना वाऱ्यावर सोडणारे राज्यातील सत्ताधारी अंदाज समिती सदस्यांसाठी आयोजित शाही मेजवानीवर कोटयावधी रुपयांची उधळपट्टी करण्यात धन्यता मानत असल्याची टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केली आहे.

अंदाज समितीच्या स्थापनेला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सरकारने मुंबई येथे विधिमंडळात देशभरातील अंदाज समिती सदस्य असणाऱ्या खासदार आणि आमदारांसाठी दोन दिवसीय परिषद आयोजित केली आहे. राज्य सरकारचे कामकाज आणि अनावश्यक बाबींवर होणाऱ्या खर्चावर नियंत्रण कसे आणायचे यावर अशा परिषदांमधून मंथन होणे गरजेचे असतांना याकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करून परिषदेत सहभागी झालेल्या अंदाज समितीतील सदस्य असणाऱ्या खासदार, आमदारांसाठी महाराष्ट्र सरकारच्या अंदाज समितीने शाही मेजवानी देत राज्यातील संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसह कष्टकरी,बेरोजगार युवक आणि सामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळले असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केला आहे.शेतकऱ्यांची कर्जमाफी, लाडक्या बहिणींना प्रतीमहा २१०० रुपये देण्यासाठी राज्य सरकारकडे पैसे



नाहीत. अनुसूचित जाती,आदिवासी विभागा अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचा शेकडो कोटींचा निधी परस्पर इतरत्र वळवला जात आहे.राज्यातील लाखो बेरोजगार युवक सरकारी नोकरी, व्यवसायाच्या प्रतीक्षेत असतांना याकडे राज्यातील सत्ताधारी मुद्दाम दुर्लक्ष करत असल्याचे दुर्दैवी चित्र उभे असतांना दुसरीकडे मुंबई येथे विधिमंडळात देशभरातील अंदाज समिती सदस्यांसाठी आयोजित दोन दिवसीय परिषदेत मात्र ५०० रुपये प्रति ताट भाड्याने आणलेल्या चांदीच्या ताटात शाही मेजवानी दिली जात आहे. एका सदस्यासाठी एक वेळच्या जेवणाच्या थाळीवर तब्बल ४५०० रुपयांची उधळपट्टी राज्य सरकारच्या अंदाज समितीकडून केली जात आहे. एकीकडे राज्यात दररोज आठ ते दहा पेक्षा अधिक शेतकरी कर्जबाजारी व आर्थिक संकटामुळे आत्महत्या करत असतांना शाही मेजवानीवर इतक्या मोठया प्रमाणावर उधळपट्टी कशासाठी केली जात आहे असा सवालही माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केला आहे.

## संक्षिप्त

### आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने सामिल व्हा –शेख महेमूद

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



केंद्र सरकारने मुस्लीमाविरूध्द वक्फ दुरूस्ती विधेयक मंजुर करून मुस्लीमांविरूध्द मोठा अन्याय केलेला आहे. या निर्णयाविरूध्द ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड आणि देशातील अन्य मान्यवर यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. हे अन्यायकारक विधेयक केंद्र शासनाने ताबडतोब मागे घ्यावे या मागणीसाठी मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने शनिवार दि. २८ जून २०२५ रोजी इदगाह मैदान जुना जालना येथे आंदोलन करण्यात येऊन जाहिर निषेध सभा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी जालना जिल्ह्यातील जनतेने हजारोंच्या संख्येने सामिल व्हावे असे आवाहन जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद यांनी केले आहे.

या जाहिर निषेध सभेमध्ये ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ चे प्रमुख पदाधिकारी मौलाना फरजुल रहिम मुझबी, मौलाना उमरेन महसुज रहेमानी, मौलाना सय्यद सदतुल्ला हुसेनी आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवार रोजी आयोजित जाहिर निषेध सभा सायंकाळी ६ ते रात्री १० वाजता शांततेत संपन्न होणार आहे. केंद्र शासनाने या अगोदर देखिल शेतकऱ्यांविरूध्द अन्याय कारक विधेयक आणले होते. परंतू जनतेच्या रेटयामुळे शासनाला नतमस्तक व्हावे लागले. वक्फ बिल दुरूस्ती विधेयका विरोधात संपुर्ण देशामध्ये आंदोलने होत आहेत. शनिवार रोजी आयोजित आंदोलनामध्ये जालना जिल्हयातील जनतेने हजारोंच्या संख्येने सामिल होऊन शासनाला हे विधेयक मागे घेण्यासाठी भाग पाडावे असे आवाहन जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद यांनी केले आहे. जालना जिल्हा मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड चे संयोजक मौलाना अब्दुल रऊफ आणि सर्व पदाधिकारी हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्नशील असून आंदोलन शांततेत पार पाडण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

### तेराशे मुलींचे सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महिलांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आर्थिक योगदानातून कॅन्सर पेशंट एड असोसिएशन मुंबई , लॉयन्स क्लब जालना, द सिव्हिल क्लब जालना व यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २४ जून रोजी आझाद मैदानाजवळील सिव्हिल क्लबमध्ये आयोजित मोफत सर्वाइकल कॅन्सर (गर्भ मुख कॅन्सर) प्रतिबंधक लसीकरण शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण १३०० मुलींचे लसीकरण करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन लॉयन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ एच-२ चे प्रांतपाल गिरीश सिसोदिया यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी प्रांतीय कॅन्सर प्रतिबंधक अभियानाचे प्रकल्प प्रमुख किशोर बेहराणी, दिनेश बोरा, लॉयन्सचे प्रांतीय कोषाध्यक्ष जयेश ललवाणी, कॅन्सर पेशंट एड असोसिएशन मुंबईच्या संचालिका डाक्टर नूपुर खरे , प्रिया प्रसाद, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया, विजयकुमार बगडिया, कमलबाबू झूनझूनवाला, नंदकिशोर अग्रवाल, रिजन चेअरमन संजय गुप्ता, अतुल लड्डा, मीनाक्षी दाड, लॉयन्स क्लब अध्यक्षा जयश्री लड्डा, सचिव मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, सिव्हिल क्लबचे अध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, मधुसूदन भक्कड आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रांतपाल गिरीश सिसोदिया म्हणाले की, आतापर्यंत कॅन्सरमध्ये फक्त सर्वाइकल या गर्भमुख कॅन्सरवर लस निघालेली आहे. आम्ही जळगाव जिल्ह्यातून तीन वर्षांपूर्वी लसीकरण अभियान सुरू केले. आतापर्यंत २२ हजार मुलींचे लसीकरण झालेले असून, यावर्षी प्रांतात बारा हजार लसीकरण करून मुलींना सुरक्षा कवच प्रदान करण्यात आले आहे. जालन्यातील हे दुसरे शिबिर असून, यापुढे जास्त जनजागृतीची गरज भासणार नाही. कारण या शिबिरात लसीकरण करून घेतलेल्या मुलीच या अभियानाच्या ब्रँड अँबेसेडर आहेत, असे सांगून यापुढेही अभियान सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी बोलताना जयश्री लड्डा म्हणाल्या, जालना जिल्ह्यातील मुलींना भविष्यातील गंभीर आजारापासून सुरक्षित ठेवण्यासाठी आम्ही हे पाऊल उचलले. ही मोहीम म्हणजे फक्त लसीकरण नव्हे, तर आरोग्यप्रती समाजप्रबोधनही आहे. सिव्हिल क्लबचे अध्यक्ष ओमप्रकाश मंत्री यांनी सांगितले की, महिलांचे आरोग्य हा केवळ त्यांच्या कुटुंबापुरता मर्यादित विषय नसून तो संपूर्ण समाजाच्या स्वास्थ्याशी निगडीत आहे. आज जालन्यातून आरोग्यक्रांती सुरू झाली आहे. आम्ही असे उपक्रम वारंवार राबवत राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी द्वारकादास मुंदडा, बालाप्रसाद भक्कड, बळीराम बेंद्रे, विठोबा दराडे, राजेश लुनिया, योगेश उजवणे, अरुण मित्तल, रतन बजाज, पी. के. खरात, दिनेश लोहिया, गंगासागर दराडे, मीरा खरात, पांडुरंग सांगळे, कविता बजाज, संगीता रुणवाल, सारिका कामड, संगीता भक्कड, अनीता देवीदान, भारती लोहीया, जगत घुगे, सुलभा झुनझुनवाला, यांच्यासह मुंबईहून आलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांची टीम, जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिकांनी विशेष परिश्रम घेतले.

## प्रलंबित गुन्ह्याचा निपटारा करण्यात टेंभुर्णी पोलीस ठाणे जिल्ह्यात अव्वल

### सपोनि सचिन खामगळ यांची उत्कृष्ट कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी पोलीस ठाण्यात प्रलंबित गुन्ह्याचे प्रमाण अतिशय अल्प असल्याने टेंभुर्णी पोलीस ठाणे जिल्हात अव्वल ठरल्याने छत्रपती संभाजी नगर चे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या हस्ते टेंभुर्णी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांचा सत्कार करून प्रशस्तीपत्र देण्यात आले.

> गेल्या दोन वर्षांपासून आमच्या टेंभुर्णी पोलीस ठाण्यात श्री खामगळ हे रुजू झाले तेव्हापासून आतापर्यंत कुठल्याही गुन्ह्याच्या प्रकरणात राजकारण केले नाही कुणासोबत ही दुजाभाव केला नसल्याने टेंभुर्णी हद्दीत त्यांची आगळी वेगळी ओळख निर्माण झाली आहे. असा अधिकारी टेंभुर्णी वासीयांना मिळाला नाही, अतिशय उल्लेखनीय कामगिरी खामगळ यांची आहे. –समाधान पाटील सवडे

जानेवारी २०२५ ते मे २०२५ या कालावधीत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात भाग १ ते ५ ,भाग ६ चे एकूण २०८ गुन्हे दाखल होते.त्यापैकी १७२ गुन्हे निकाली काढले असून ३६ गुन्हे प्रलंबित आहे त्यामुळे प्रलंबित प्रमाण फक्त १७ टक्के आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक ,पोलीस अधीक्षक यांनी श्री खामगळ यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की,पोलीस ठाण्याच्या कामकाजावर बारीक लक्ष ठेवून संबधित तपासीक अंमलदार यांना गुन्हे निपटारा करण्यात योग्य मार्गदर्शन केले असल्याने भरपूर गुन्हे निकाली काढले असून जालना जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यापैकी आपली कामगिरी अतिशय उल्लेखनीय आहे. भविष्यातही आपली कामगिरी अशीच राहून पोलिसांची प्रतिमा उंचवावी असे या सन्मान पत्रात नमूद केले आहे.टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गावकऱ्यांकडून टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सपोनि सचिन खामगळ यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## परतूर येथील कुख्यात गुंड खोबऱ्या काळेच्या मुसक्या आवळल्या

### २ गुन्हे उघडकीस, मुद्देमाल जप्त, परतुर पोलीसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**



दिनांक २१/०६/२०२५ रोजी तक्रारदार सुंदरराव जर्नाधनराव कदम रा. गुळखंड ता. मंठा जि. जालना ह.मु. विठठल नगर परतुर जि. जालना, हे दिनांक २०/०६/२०२५ रोजी रात्री अकरा वाजता सुमारास गळकुंड गावातुन परतुर येथे आपल्या घरी स्कुटीने येत असतांना परतुर सरकारी दवाखाना जवळ रोडवर तिन अज्ञात इसमांनी मोटार सायकल त्यांचा पाठीमागुन पाठलाग करुन त्यांना आडवुन धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी देवुन पॅन्टचे खिशातील नगदी ९५०० रुपये व त्यांचे जवळील आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर महत्वाचे कागदपत्रे बळजबरीने हिसकावून काढुन घेवुन पसार झाले होते, त्यावरून घटनेचे अनुषंगाने पोलीस ठाणे परतुर येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणे करीता पोलीस निरीक्षक श्री. मच्छींद्र सुरवसे यांनी आपल्या अधिनीस्त अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत करुन परतूर पोलीसांनी दिनांक २४/०६/२०२५ रोजी आरोपी खोबऱ्या शिवाजी काळे रा. पाडळी पु. यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे दोन साथीदारासह सदरचा व इतर आणखी एक गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील फिर्यादीचे महत्वाचे कागदपत्रे व २१००/- रोखरक्कम हस्तगत करण्यात आली आहे. सध्या सदर आरोपी एम.सी.आर झालेला असुन गुन्हयाचा तपास पोउपनि भिमराव मुंढे हे करीत आहेत. तसेच मागील काळात असाच अजुन एक गुन्हा केल्याचे तपासात सांगितले आहे. सदरची कारवाई ही मा. श्री. अजय कुमार बन्सल साहेब, पोलिस अधीक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपानी साहेब, अपर पोलिस अधीक्षक जालना, उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर श्री. दादाहरी चौरे, यांचे मार्गद्शनाखाली, एम. टी. सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर, पोउपनि विठठल केंद्रे, पोउपनि अमोल रावते, पोउपनि भिमराव मुंढे, पोकॉ/ दिपक आढे, पोकों/ वंदन पवार, पोकॉ/परमेश्वर माने,पोअं/ज्ञानेश्वर वाघ, पोकॉ/राम हाडे, आदीनी केलेली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीतील चित्रांचे प्रदर्शन महिनाभर खुले राहणार

### संविधान हत्या दिवस-२०२५ कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला आज ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने आणीबाणीत लढा दिलेल्या जालना जिल्ह्यातील व्यक्तींचा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देवून सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी उपस्थित सर्वांचे कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले. मानधन प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे नियोजन केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच मानधनासंदर्भात काही अडचणी असल्यास त्या संबंधित कक्षात नोंदविण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी केले.

आणीबाणीला ५० वर्षे पुर्ण भारतीय इतिहासातील काळाकुट्ट अध्याय..! संविधान हत्या दिवस-२०२५ या कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार नारायण कुचे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, उपविभागीय अधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह आणिबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्तींची उपस्थिती होती. १९७५ ते १९७७ या आणीबाणीच्या कालावधीत जालना जिल्ह्यातील ५६ व्यक्तींनी सामाजिक आणि राजकीय कारणांसाठी कारावास भोगला होता. या व्यक्तींना सन्मानपत्र देऊन गौरविण्याच्या सूचना शासनाकडून प्राप्त झाल्या होत्या. जिल्ह्यातील ५६ व्यक्तींपैकी उपस्थित व्यक्तींचा सन्मान या जिल्हास्तरीय कार्यक्रमात करण्यात आला. तसेच प्रत्येक संबंधित तालुक्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



१९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही मुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षासमोरील सभागृहात आणीबाणी कालावधीतील चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रदर्शन एक महिनाभर सर्वांसाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत खुले राहणार आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा. असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## भोकरदन येथील किशोर पांडेजी यांना 'योगरत्न' पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

जालना येथील सुप्रसिद्ध योग प्रशिक्षक किशोर पांडेजी यांना २२ जून रविवार रोजी आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, ए जी एम ए, व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) डॉक्टर सेल आयुष विभाग वतीने अतिशय प्रतिष्ठेचा योगरत्न पुरस्कार मोठ्या थाटात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद )तेथे देण्यात आला. या पुरस्काराला महाराष्ट्रातील योगशिक्षक योग थेरपीस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये शिक्षण सम्राट समजल्या जाणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेलचे प्रदेश अध्यक्ष डॉक्टर श्री बाळासाहेब पवार साहेब हे कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून उपस्थित होते. सोबत पाहुण्यांमध्ये उद्योजक मनोज दांडगे साहेब उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ नितीन राजे पाटील आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व्हाईस चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेल प्रदेश कार्याध्यक्ष (आयुष विभाग) डॉक्टर सतीश कराळे चेअरमन आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, डॉक्टर डॉ बाबुराव कानडे अध्यक्ष आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, दिशा चव्हाण,प्रशांत सावंत, प्राध्यापक कुणाल महाजन, श्री मनोहर कानडे, व इतर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. किशोर पांडेजी यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्या बद्दल सर्व स्तरावरून किशोर पांडेजी यांचे कौतुक होत आहे व शुभेच्छाच्या वर्षाव होत आहे.

## पर्यावरणाची काळजी, आर्थिक बचत आणि भविष्यातील ऊर्जेची गरजा पूर्ण करण्यासाठी सौर ऊर्जा महत्त्वाची आणि फायदेशीर –आ.बबनराव लोणीकर

### वाटूर व सातोना येथील १४१७ घरावर हर घर सोलार योजने अंतर्गत सोलार बसविण्याच्या कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

सौर ऊर्जेचे अनेक फायदे असून ते पर्यावरणासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. सौर ऊर्जा ही स्वच्छ ऊर्जा आहे. जीवाश्म इंधनाच्या तुलनेत, सौर ऊर्जेचा वापर केल्यास प्रदूषण कमी होते. ग्रीनहाऊस वायूंचे उत्सर्जन कमी होते. वातावरणातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. सौर ऊर्जेमुळे वीज बिल वाचते. सौर पॅनेल बसवल्यास, घरासाठी किंवा व्यवसायासाठी लागणारी वीज आपण स्वतःच निर्माण करू शकतो. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या उपकरणांच्या वापरामुळे खर्चात बचत होते. सौर ऊर्जा ही एक महत्त्वाची आणि फायदेशीर ऊर्जा असून पर्यावरणाची काळजी घेणे, आर्थिक बचत करणे आणि भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.



परतूर तालुक्यातील वाटूर (२७८ लाभार्थी) व सातोना (११३९ लाभार्थी) अशा एकूण १४१७ घरावर हर घर सोलार योजने अंतर्गत सोलार बसविण्याच्या कामाचा शुभारंभ आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. हर घर सोलार ही योजना महावितरणच्या घरगुती ग्राहकांसाठी लागू असून छतावरील सौरऊर्जा पॅनेलद्वारे वीजनिर्मिती, घरगुती वापरापेक्षा जास्त झाल्यास वीजबिल शून्य होणार आहे. जास्त निर्मित ऊर्जा महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याची सुवर्ण संधी असून वीज ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे खालीलप्रमाणे अनुदान वितरित केले जाणार आहे. असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. या संदर्भात पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, महिला बचत गटांना कर्ज वितरण करणे अत्यंत महत्त्वाचे असून यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनण्यास मदत होते, तसेच त्यांच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या विकासालाही चालना मिळते. महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा आधीच असलेल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी कर्जाची आवश्यकता असते.

बचत गटांच्या माध्यमातून कर्ज मिळाल्याने, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यास मदत होते. बचत गटांना कर्ज उपलब्ध झाल्यावर, महिलांना उत्पन्नाचे नवीन मार्ग मिळतात, ज्यामुळे त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे दारिद्र्य कमी होते. महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा आधीच असलेल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी कर्जाची आवश्यकता असते. बचत गटांच्या माध्यमातून कर्ज मिळाल्याने, महिलांना स्वतःचा व्यवसाय वाढवण्यास मदत होते असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड तहसीलदार प्रतिभा गोरे, रमेशराव भापकर, संभाजी वारे, परमेश्वर आकात निवृत्ती लाटे गुलाबराव लाटे विलास आकात, कोंडीराम आकात भोजीराम आकात गजानन लिपणे, मोहनराव आढे, पद्माकर कवडे, सुधाकर पडूळकर, डॉ.गजानन केशरखाने, सौ. कमलबाई केशरखाने (सरपंच), बद्रीनारायण खवणे, बंडू मानवतकर, राजेश माने, कुंडलीक उघडे, इस्माईल शेख, बाबाभाई शेख, सौ.विजयमाला खवणे, सौ. रेणूका शिंदे, सौ. कांताबाई सातपुते, सौ. सुशिला अंभीरे, सौ. दुर्गाबाई पडूळकर, विठ्ठल बिडवे रंगनाथ रेंगे भगवान आरडे परमेश्वर लाटे सय्यद भाई, छायाताई घोरबांड अर्चना आकात गणपत वारे, उद्धव वायाळ, राधाकीशन माने, बाळासाहेब अभिरे, नजिर भाई पटेल, कृष्णा निकम, राजु दादा वायाळ, जगदीश पडूळकर, राधेशाम पाटोळे राजेश आळने, कैलास आग्रवाल, शुभम आढे, राजेश माने, सिराज पठाण, माधवसिग जनकवार, सुधाकर पडुककर, अनिल मोरे, रतन सिरसाठ, डिगाबर मोरे, पोपटराव खंदारे सोपानराव वायाळ सुभाषराव बागल कार्यकारी अभियंता महावितरण श्री मठपती, गटविकास अधिकारी राजेश तांगडे ग्रामपंचायत अधिकाऱ्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष डीबी काळे, ग्रामपंचायत अधिकारी नामदेव काळे, बी एस चव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# किनवट रेल्वे भुयारी पुल प्रकरणी दिल्लीतील सुनावणीत निर्णायक घडामोडी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२६ जून -**

शहरातील शिवाजीनगर परिसरात सुरू असलेल्या रेल्वे भुयारी पुल प्रकरणी आज दिल्ली येथे राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगात निर्णायक सुनावणी पार पडली. सदर याचिका ही किनवटचे आमदार भीमराव केराम यांनी दाखल केली होती. या सुनावणीत नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, तसेच रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



सुनावणी दरम्यान, जनतेच्या वतीने आ. केराम यांनी आपली बाजू ठामपणे मांडली. त्यांच्या युक्तिवादाची पुष्टी करत जिल्हाधिकारी कर्डीले यांनी सुद्धा ही बाजू सत्य व योग्य असल्याचे स्पष्टपणे मान्य केले. त्यांनी प्रशासनाची ही भूमिका लेखी स्वरूपात आयोगासमोर सादर केली.

राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांनी यासंदर्भात त्वरित न्यायोचित कारवाईचे निर्देश देत, जुना गेट तात्काळ सुरु करण्याचा आदेश दिला आहे. तसेच, २८ जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी, रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक , तक्रारदार आमदार भीमराव केराम आणि जनजाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे हे संयुक्त पाहणी करतील, आणि त्यानंतर तातडीने अहवाल सादर करण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

या प्रकरणातील पुढील सुनावणी २१ जुलै २०२५ रोजी होणार असून, रेल्वे बोर्ड व जीएम सिकंदराबाद यांना देखील यावेळी उपस्थित राहण्याचे निर्देश आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य यांनी दिले आहेत.

या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असून, यामुळे स्थानिक जनतेमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री फडणवीसांचं प्रमोशन होवो अजितदादा मुख्यमंत्री बनो ; आ.चिखलीकरांचे पांडुरंगाला साकडं

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ जून -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रमोशन होवो आणि अजित दादा पवार मुख्यमंत्री बनो असं साकडं राष्ट्रवादीचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पांडुरंगाचे दर्शन घेऊन घातले. दरवर्षी प्रमाणे यंदाही आ.चिखलीकर हे आज पंढरपूर येथील विठ्ठल -रुक्मणीचे दर्शन घेतले. यावेळी पत्रकारांनी आ.चिखलीकर यांना विचारले असता ते म्हणाले, पांडुरंगाकडे माझा बळीराजाला सुखी ठेवा, पावसा अभावी शेतकऱ्यांवर दुबार पेरणी वेळ येवू नये देवू नका असं साकडं घातलं असल्याचे ते म्हणाले. पंढरपूरचे दर्शन घेतल्यानंतर आ.चिखलीकर हे श्री



क्षेत्र शिखर शिंगणापूरच्या महादेवाचे मनोभावे अभिषेक करुन दर्शन घेतले. सायंकाळी लोणंद येथे पंढरपूरकडे निघालेल्या माऊलीच्या पायी दिंडीचे दर्शन घेवून दिंडीतील जवळपास २१ वारकऱ्यांच्या पायी दिंडीला भेटी देऊन वारकऱ्यांचे दर्शन घेवून भोजनाची पंगत दिली.यावेळी आ.चिखलीकर यांच्या समवेत माजी आ.मोहनराव हंबर्डे,उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबनराव बाराशे, माजी जि.प.सदस्य गणेश सावळे, ज्येष्ठ पत्रकार प्रल्हाद उमाटे, भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य दिलीप सोनटक्के, विनायक पाटील, बळी पाटील जानापुरीकर,पुण्याचे उद्योजक गुलाब शुक्ला, बाबुराव केंद्रे, बालाजी झुंबाड, स्वप्नील लुंगारे, डॉ.उत्तम सोनकांबळे आदिंची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### कुंटुंर पोलिस ठाण्यात सपोनि. विशाल भोसले यांचे स्वागत

**नायगाव** -तालुक्यातील कुंटुंर पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक(स.पो.नि.)म्हणून नुकते च नियुक्ती झालेल्या विशाल भोसले यांचे वंचित बहुजन युवा आघाडी, नांदेड (दक्षिण) यांच्या वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांना शाल व पुष्पहार अर्पण करून जाहीर सत्कार करण्यात आला. या स्वागत समारंभाला वंचित बहुजन युवा आघाडी चे जिल्हा उपाध्यक्ष दीपक माधवराव गजभारे (घुंगराळेकर), माजी सरपंच प्रा. मोहन जोगेवार, मोहन तूरटवाड, व्यंकटराव ढगे, कैलास सुगावे, लक्ष्मण कासराळे, मुसा शेख आदी मान्यवर आणि स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशाल भोसले हे कर्तव्यदक्ष,जनतेशी संवाद साधणारे आणि लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळखले जातात.त्यामुळे त्यांच्या नियुक्तीमुळे कुंटुर परिसरातील नागरिकांमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. दरम्यान, कुंटुंर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदेड देगलूर ह्या राज्य महामार्गा लगत असलेल्या ढाब्यावर गेल्या काही महिन्यां पासून गुटखा विक्री, मटका, जुगार, अवैध दारू विक्री अशा अवैध व्यवसायांना ऊत आला आहे. त्यामुळे कायदासुव्यवस्थेला वारंवार तडा जात असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर सपोनी विशाल भोसले यांच्या नेतृत्वाखाली या अवैध व्यवसायांवर कडक कारवाई होईल, अशी जनतेची अपेक्षा आहे.नवीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर या परिसरात काय बदल घडतो आणि कायद्या-सुव्यवस्थेच्या दृष्टीने परिस्थिती सुधारते का, हे येणारा काळच ठरवेल.



### सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक उमाकांत पाटील यांचे निधन

**देगलूर** - तालुक्यातील देगाव येथील सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक उमाकांत तुकाराम पाटील जाधव (वय ६४) यांचे आज २६ जून रोजी सकाळी ८ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.उमाकांत पाटील यांनी पोलीस खात्यात दीर्घकाळ अत्यंत प्रामाणिक,शिस्तबद्ध आणि कर्तव्यनिष्ठ सेवा बजावली.ते कर्तव्यकठोर व संयमी स्वभावाचे अधिकारी म्हणून ओळखले जात होते.सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपली जबाबदारी पार पाडली. त्यांच्या पश्चात वृद्ध आई,पत्नी,भाऊ,भावजय,दोन मुले,सून,नातवंड असा परिवार आहे.ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते विशाल पाटील जाधव यांचे वडील होत.आज दुपारी ३ वाजता देगलूर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.स्थानिक पोलीस अधिकारी,राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर,नातेवाईक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### राजेश मनुरे यांना राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार जाहीर

**धर्माबाद** - तालुक्यातील सामाजिक , राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणून परिचित असलेले श्री राजेश मनुरे यांना अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स या सामाजिक संघटनेच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राजेश मनुरे हे बहुजन चळवळीत मागील तीस वर्षांपासून काम करीत आहेत.धर्माबाद नगर पालिकेचे शिक्षण सभापती म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. सामाजिक चळवळीत त्यांनी सर्वसामान्य लोकांना न्याय मिळावा यासाठी अनेक जनआंदोलन केले आहेत.तसेच शोषित, वंचित लोकांच्या न्याय हक्कासाठी आपली लेखणी चालवून शासनाला जागे करण्याचे काम केले आहे. सामाजिक, राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कामाची दखल घेत राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला. या बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



### सोनखेडमध्ये समता सैनिक दलाची साप्ताहिक परेड

**सोनखेड** -नांदेड दक्षिण मतदार संघातील पंचशील बुद्ध विहार सोनखेड येथे दिनांक २२ जुन रोजी समता सैनिक दलाच्या साप्ताहिक परेड घेण्यात आला. भारतीय बौद्ध महासभा जिल्हा अध्यक्ष हौसाजी वारघडे, सेक्रेटरी रत्नाकर महाबळे, कोषाध्यक्ष बि डी कांबळे, जि.संघटक सुभाष खाडे, संरक्षण उपाध्यक्ष संतोष दुंडे , जिल्हा संरक्षण सचिव आनंद पुरभाजी गोडबोले व भीमराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा तालुका अध्यक्ष बापूसाहेब कापुरे, सेक्रेटरी धोंडिबा यानभुरे, संरक्षण सचिव आकाश थोरात व तुकाराम खिल्लारे, महिला जिल्हा संरक्षण सचिव सुनिता खिल्लारे यांनी सोनखेडमध्ये समता सैनिक दल साप्ताहिक परेड संचलन घेतले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष तथा केंद्रीय शिक्षक मेजर संतोष दुंडे सर, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण सचिव आनंद पुरभाजी गोडबोले, लोहा तालुका संरक्षण सचिव आकाश थोरात, सैनिक प्रकाश खिल्लारे, महिला जिल्हा संरक्षण सचिव सुनिता खिल्लारे, छाया सुर्यवंशी, ता. संरक्षण सचिव राधाबाई धुतराज व कविता निवडंगे, इंदुबाई खिल्लारे, नंदा खिल्लारे, अर्चना खिल्लारे, अल्का धुतराज, सुमनबाई सुर्यवंशी, गोकर्णाबाई खिल्लारे यांची परेडसाठी उपस्थिती होती.

# हदगाव विधानसभेतील १९ देवस्थानांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२६ जून -**

हदगाव तालुक्यातील १९ देवस्थानांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त झाला आहे. यामध्ये हदगाव तालुक्यातील १७ व हिमायतनगर तालुक्यातील २ देवस्थानांचा समावेश आहे.



या देवस्थानाला आता विशेष निधी उपलब्ध होणार असल्याने तीर्थक्षेत्र दर्जा मंजूर झाल्याने या सर्व देवस्थानांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. बाबूराव कदम कोहळीकर यांच्या विशेष प्रयत्नांना यश प्राप्त झाले आहे. आ. कोहळीकर यांनी दि. ३० जानेवारी २०२५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हा विषय मांडला होता. त्यांनी या निर्णयासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर दि. २४ जून २०२५ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हदगाव तालुक्यातील उपरोक्त विषयी निर्णय घेण्यात आला. यामध्ये हदगाव तालुक्यातील १७ व हिमायतनगर तालुक्यातील २ मंदिराचा समावेश आहे.

# काँग्रेस पक्षाच्या वतिने शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२६ जून -**

मुदखेड तालुका शहर व युवक काँग्रेसच्या वतिने जिल्हा पत्रकार संघावर प्रतिनिधित्व मिळालेल्या तसेच उबाठा शिवसेना पक्षाच्या शहरप्रमुख पदी नव्याने नियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा पार पडला.



मुदखेड तालुका शहर व युवक काँग्रेसच्या वतीने दि.२३ जून रोजी शासकिय विश्राम गृहात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. माजी नगराध्यक्ष काँग्रेसचे जेष्ठ नेते राजबहादूर कोत्तावार अध्यक्षस्थानी होते माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव देवदे, करीम खान, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, रिसर्च डिपार्टमेंटचे चेअरमन माधव हामंद डोणगांवकर, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत मुंगल, युवक शहराध्यक्ष मुजीब पठाण, शिवानंद देवके, अविनाश चौदंते, साहेबराव गोरकवाड, वेदांत शेवटे, आकाश सोनटक्के, श्रिनिवास महाद्वाड, इक्बाल खुरेशी, साई बोंतले, लतीफ टेलर, संजय बोकेफोड यांच्यासह आदी उपस्थित होते.

जिल्हा पत्रकार संघाच्या संघटक पदी संजय कोलते, जिल्हा सहसचिव पदी इश्वर पिन्नलवार यांची निवड झाल्याने काँग्रेस पक्षाच्या वतिने सत्कार करण्यात आला. शिवसेना (उबाठा) पक्षाच्या शहरप्रमुख पदी अविनाश झमकडे, साहेबराव चव्हाण यांच्या निवडिचे स्वागत करण्यात आले आहे. यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, धम्मदाता कांबळे, साहेबराव गागलवाड, साहेबराव हौसरे, नामदेव राहेरे, माधव पावडे, मोईन भई फुलवाले, यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिडको घर हस्तांतरण प्रक्रिया निकाली काढण्यात येणारी समिती समरनार्थ निवेदन सादर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२६ जून -**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर संघटक प्रमोद मेड हे सिडकोच्या घर हस्तांतरण करा हे प्रकरण गेल्या २०१४ पासून प्रयत्न करत आहेत्. यासाठी तीन महिन्यापूर्वी सभागृहांमध्ये या बाबीवर चर्चा होऊन एक समिती नेमण्यास सांगितले होते. ती समिती दिनांक २३ जून पर्यंत गटीत झाली नसल्याने प्रमोद मेड यांनी समितीसमरणार्थ निवेदन सादर केले आहे.

सिडको येथील मुळ मालकांच्या अनुपस्थितीमध्ये घरांचे हस्तांतरण करण्यास तोडगा काढण्यासाठी एक समिती सरकारने नेमण्यात आलेली आहे. ज्या समितीमध्ये जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त व सिडकोचे मुख्य प्रशासक यांचा समावेश असून या समितीने ३ महिन्याच्या कालावधीमध्ये निर्णय शासनाला कळवावे असे सांगण्यात आले होते. पण आज घडीला ही समिती गतीतच झाली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रमोद मेड यांनी समितीच्या विचारपूस करण्यासाठी पुन्हा निवेदन देऊन सिडको प्रशासकास जागी करण्याचे काम एका निवेदनाद्वारे दिनांक २३ जून रोजी सादर करण्यात आले.शिवसैनिकांनी या गोष्टींचा पाठपुरावा केला आहे तसेच या समितीने आम्हाला देखील विचारात घ्यावे; तसेच क्रमांक १ चा मुद्दा असा आहे की याआधी सिडकोकडे कुठलीही रजिस्ट्री करण्याची पद्धत नव्हती त्यामुळे हे घर लोकांना बाँड पेपरवर घ्यावे लागले व त्यानंतर सिडकोने. ९२०५ ठराव मंजूर करून असे घरे थर्ड पार्टी म्हणून त्या काळात त्यांनी त्या त्या लोकांना न्याय मिळेल हा प्रश्न सिडको च्या धरतीवर आहे. म्हणून याकडेही समितीचे लक्ष वेधले पाहिजे आशी संपूर्ण सिडको करायची अपेक्षा आहे. सदरील निवेदनासोबत महत्त्वाची कागदपत्र जोडलेले आहेत जोडलेली कागदपत्र पाहून समितीने पूर्वीच्या पद्धतीने थर्ड पार्टी पद्धतीने घरे त्या त्या लोकांच्या नावावर करून देण्याची विनंती शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहर संघटक प्रमोद मेड यांनी एका निवेदनाद्वारे केले आहे.

# माहूर तालुक्यातील सरपंच पदांचे आरक्षण सोडतीचा दिनांक जाहीर

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.२६ जून -**

माहूर तालुक्यातील २१ ग्रामपंचायतचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम तहसीलदार मुगाजी काकडे यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशाने जाहीर केला असून याबाबत दि १ जुलै रोजी दुपारी ३ वाजता पंचायत समिती मधील वसंतराव नाईक सभागृहात बैठक होणार आहे.जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडील अधिसूचना क्र. २०२५/जिबि/डेस्क-१/२-५/ग्रापंनि/सरपंच आरक्षण २०२५ / सिआर ०२ दिनांक २३/०६/२०२५ अन्वये माहुर तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग आणि स्त्रीया यांच्यासाठी राखून ठेवावयाची सरपंचाची पदे मुंबई ग्राम पंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ च्या नियम २ अ (२) अन्वये जिल्हाधिकारी, नांदेड यांनी खालील तपशिलानुसार अधिसूचीत करुन दिले आहे.

अनुसूचित जातीसाठी १ पद असून तेही महिलांसाठी राखीव आहे. अनुसूचित जमातीसाठी १ पदासाठी ते पण महिलासाठीच राखीव असणार आहे. नागरिकांच्या मागास प्रभावकांसाठी ६ पदे असून यापैकी तीन पदे महिलांसाठी राखीव आहेत. खुल्या प्रवर्गासाठी १३ पदे असून यापैकी ७ सरपंच पदे महिलांसाठी राखीव आहेत. एकूण २१ सरपंच पदांपैकी १२ पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

**सरपंच, उपसरपंच, सदस्यांनी उपस्थित रहावेः तहसीलदार काकडे**



सदरील आरक्षण हे सन २०२५-२०३० मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणूकांसाठी अमलात राहील. सदर प्रवर्गाच्या सरपंच पदासाठी सोडत पध्दतीने आरक्षण वसंतराव नाईक पंचायत समिती माहुर येथील सभागृहात दि. ०१ जुलै रोजी दुपारी ३.०० वाजता करण्यात येईल. सर्व माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, ग्राम पंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार, मुगाजी काकडे यांनी केले आहे.

# धनोडा-भोकर राष्ट्रीय महामार्गासाठी आमदार केराम यांचे मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२६ जून -**

धनोडा ते भोकर दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१(ए) वरील अपूर्ण कामे, वनविभागामुळे थांबलेली घाट रस्त्यांची प्रगती, निकृष्ट दर्जाचे रस्ते, तसेच पैनगंगा नदीवरील नवीन पुलाची दुर्दशा या सर्व समस्यांबाबत आमदार भिमराव केराम यांनी गुरुवारी (दि. २६) रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी करत राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याची विनंती केली.



धनोडा गावाजवळ पैनगंगा नदीवर बांधण्यात आलेला नवीन पूल पूर्णत्वास गेला आहे. परंतु, दोन्ही बाजूंनी म्हणजे धनोडा आणि माहूर या दिशेने जोडरस्ते तयार न झाल्याने विदर्भातून माहूर येथे येणाऱ्या भाविकांना जुन्या, जीर्ण पुलावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. नवीन पूल असूनही त्याचा उपयोग होऊ न शकणे ही दुर्दैवी स्थिती असून यामुळे संभाव्य अपघातांचे संकट सतत निर्माण होते. त्यामुळे या पुलास जोडणारे रस्ते तातडीने पूर्ण करून वाहतुकीस सुरळीतपणे खुला करावा, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच सुनिल हायटेक कंपनीच्या कामाची सखोल चौकशी करून त्वरित कार्यवाही करावी आणि रस्त्याची दुरुस्तीही तातडीने करावी, अशी आग्रही मागणी आमदार केराम यांनी केली.




**नांदेड - छायाचित्रकार सचिन मोहिते यांना राज्य सरकारचा वृत्तपत्र छायाचित्रकार राज्यस्तरीय पुरस्कार घोषित झाल्याबद्दल शासकीय विश्रामगृह पत्रकारांनी त्यांचा आज सत्कार करण्यात केला. यावेळी संपादक गोवर्धन बियाणी, कार्यकारी संपादक संतोष पांडागळे, विजय निलंगेकर, रविंद्रसिंह मोदी, नरेश दंडवते, राम तरटे, अंकुश सोनसळे, प्रविण खंदारे, श्याम कांबळे यांच्यासह शहरातील पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# शालेय गणवेश वाटपात महाघोटाळा करणाऱ्यावर कारवाई करा : संदिप गोवंदे

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२६ जून -**

शालेय गणवेशात जिल्हात महाघोटाळा झाला असुन महिला अर्थीक विकास महामंडळ यांनी स्थानिक महिला बचतगट यांना शिवनकाम न देता कंट्राकी पद्धतीने गणवेशाचे कामे देवून मोठा भष्ट्राचार केला असुन त्यांची चौकशी करून संबंधीत दोषी अधिकारी यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी अशी मागणी उमरी माहिती अधिकार तालुका अध्यक्ष संदिप गोवंदे यांनी मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री , शिक्षण मंत्री आणि महिला आर्थिक विकास महामंडळ व्यवस्थापकीय संचाल मुंबई यांच्याकडे केली आहे .



महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी २२ मार्च २०२४ रोजी शासकीय परिपत्रकाव्दारे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा मध्ये इय्यता पहिली ते आठवी पर्यंत च्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीना राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजना प्रति विद्यार्थी यांना दोन गणवेश प्रदान करण्याचे आदेश दिले पण या योजनेच्या निकषाची पायमली करून गणवेश शिलाईचे काम स्थानिक बचत गट महिलाना देण्यात आले नाही त्यामळे नियमात तरतुद असल्या प्रमाणे स्थानिक बचत गटातील महिलाचे मोठे अर्थीक नुकसान झाले असून महिला सबलीकरण अर्थार्जन घडविणे हा शासनाचा हेतू फेल झाला असून सदर यादीत महिला चे नावे दाखवून शालेय गणवेशात भ्रष्ट्राचार झाल्याचा अरोप करीत जिल्हात शिक्षण विभागात घो निर्माण झाल्याचा माहिती अधिकार उमरी तालुकाध्यक्ष संदिप गोवंदे यांनी निवेदनात केला आहे .

या घोटाळ्यामुळे स्थानिक बचत गटाच्या महिलावर अन्याय झाला असल्याचे माहिती अधिकार तालुकाध्यक्ष संदिप गोवंदे यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# पं.स. कार्यालयातील घरकुल विभाग सीसीटिव्ही कॉमऱ्याच्या निगराणीखाली

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२६ जून -**

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी नुकत्याच पार पडलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पंचायत समिती कार्यालय गतीमान करण्यासाठी व कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी घरकुल विभागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश दिले या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करत प्रकल्प संचालक संजय तुबाकले व लोहा गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा पंचायत समिती कार्यालयातील घरकुल विभागाचे प्रमुख दिनेश तेलंग यांनी त्वरित सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली यामुळे येथील अधिकाऱ्यांच्या पूर्ण कामकाजावर सीसीटीव्ही कमेऱ्याची नजर असल्याने चिरीमिरी व भ्रष्टचाराला आळा बसणार आहे व कामकाज गतीमान होणार आहे. कार्यालय बाहेरील दलाला चाप बसणार आहे.कार्यालयात फाईल घेऊन येणे अडचणीच्या लाभार्थ्यांना सावज करणे आवास योजनेचे काम करुन देतो बांधकाम घरकुलाचे हाप्ते काढुन देतो असे सांगून लाभार्थ्यांकडुन रक्कम उखळी जात होती लाभार्थी दलालावर विस्वास ठेऊन लवकर काम होईल या अशेपोटी रक्कम दिली जात होती.या प्रकाराला आळा बसणार आहे लाभार्थ्यांनी थेट गटविकास अधिकारी किंव्हा घरकुल विभाग दिनेश तेलंग यांच्याकडे संपर्क करुन आडचनीची सोडवणूक करुन घ्यावी फसवेगिरीला बळी पडुन नये.पंचयत समिती विभागात कोणत्याही लाभार्थ्यांसोबत असे प्रकरण घडू नये, याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सर्वांना या विभागात सीसीटीव्ही बसवण्यासाठी आदेश केले.

पंचायत समिती कार्यालयात कामासाठी व घरकुल विभागात पैशाची मागणी करत असेल तर तात्काळ गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच, घरकुल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी लाभार्थ्यांना कोणताही आर्थिक मोबदला न घेता निस्वार्थ भावनेने सेवा द्यावी, असे स्पष्ट करत प्रशासनाने पारदर्शकतेला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत.

# तलाठी, मंडळअधिकारी कृषीसहाय्यक,कृषी मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना मुख्यालयावर राहण्याचे आदेश द्या-भाई मोहन गुंड

**शंभर पन्नास किलोमीटर वरून नोकऱ्या करतात अधिकारी जिल्हाधिकाऱ्याकडे शेकापची तक्रार**



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२६ जून**

कृषी क्षेत्रामध्ये महत्त्वाचे अधिकारी म्हणून तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी, ग्रामसेवक हे शासकीय यंत्रणेतले प्रमुख महत्त्वाचे घटक अधिकारी आहेत. मात्र हे अधिकारी आपल्या नेमणूक झालेले तलाठी, मंडळ अधिकारी सज्जावर तर कृषी सहाय्यक मंडळ अधिकारी मंडळात, ग्रामसेवक मुख्यालयात राहातं नाहीत. पावसाळ्याचे दिवस आहेत कधीही नैसर्गिक आपत्तीचे निर्माण होऊ शकते, म्हणून सदरील अधिकाऱ्यांनी आपल्या नेमुन दिलेल्या मुख्यालयात मुक्कामी रहावे अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये एक ही तलाठी, मंडळाधिकारी आपल्या सज्जावर राहत नाही, स्वतःचे खाजगी रायटर आफीसला बसवलेले असतात आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्यापूर्त येतात, सर्व कार्यालय शहरांमध्ये थाटलेले आहेत, आयाराम गयाराम सारखा प्रकार तलाठी मंडळाधिकाऱ्यांचा आहे. कृषी विभागाचे अधिकारी असून नसल्यासारखे आहेत कधीच कार्यालयामध्ये दिसत नाहीत, कार्यालय मध्ये गेलं तर त्यांचे संबंधित विभागाला स्वतःच्या मोबाईल नंबर शेतकऱ्यांना दिसतील असे लिहीले नाहीत, आवश्यक अधिकाऱ्याची विचारणा केली तर साहेब साइटवर गेले म्हणून सांगतात वेळ मारून नेहतात अशा पद्धतीचा कारभार कृषी विभागाचा चालतोय. ग्रामसेवक तर गावात जातच नाहीत पंचायत समीतीत बसुन काम करतात. अनेक कृषीसहाय्यक, कृषी मंडळाधिकारी, तलाठी, मंडळअधिकारी. ग्रामसेवक मुख्यालया पासुन ५० /१०० किलोमीटर अंतरावरुन येऊन नौकरी करतात. नैसर्गिक आपत्ती झाली यांना दुसऱ्या दिवशी कोणाच्यातरी सांगण्या वरून बातमी बघुन कळते रात्री गावाकडे पाऊस झाला, मग येणार पंचनामा करायला अशी परिस्थिती आहे, यामुळे किमान नैसर्गिक आपत्तीचा काळ पाहता महसुल विभाग, कृषी विभाग खूप महत्त्वाचा विभाग आहे यामुळे त्यानी आपल्या मुख्यालयावर तात्काळ राहावे असे आदेश जिल्हाधिकारी यांनी द्यावेत जो अधिकारी मुख्यालयात राहात नाही आशा कर्मचारी अधिकार्यावर कारवाई करावी असे लेखी पत्र शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड, ड गोले पाटील,भाई अशोक रोडे, भाई अर्जुन सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांना निवाशी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिले आहे.

**जिल्ह्यात अधिकाऱ्यांना वेळेच बंधन नाही, आयाराम गयाराम सारखी नौकरी केली जाते, सर्वसामान्य माणसांना वेठीस धरले जाते, अधिकारी एवढे मगरू बनत चाललेले आहेत, कुठल्या तरी पुढार्याचे हस्तक होऊन काम करतात अधिकार्यानी आपन सामान्य लोकांचे नौकरी याचे भान ठेवावे, हालगर्जीपना खपवून घेणार नाही.**
**भाई मोहन गुंड**

# दुचाकी चालवताना हेल्मेट वापरण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ जून**

जिल्हयातील सर्व नागरिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदीनुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक आहे. याबाबत वेळोवेळी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट सक्तीचे आहे, असे निर्णय दिलेले आहेत.



जिल्ह्यात सन २०२४ मध्ये रस्ता अपघातामधील मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू दुचाकीस्वार यांचे झालेले आहेत. यामध्ये ६० % पेक्षा जास्त अपघात मृत्यू हेल्मेट परिधान न करता गाडी चालविल्यामुळे झालेले दिसून येत आहेत. जिल्ह्याच्या विकासात प्रशासनाची भूमिका महत्वाची आहे. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी हे प्रशासनाचा कणा समजण्यात येतात. शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे वर्तन समाजासाठी नेहमीच अनुकरणीय असे आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना, सार्वजनिक रस्त्यावर वावरताना हेल्मेट परिधान केल्यास सर्व नागरिकांमध्ये हेल्मेट परिधान करण्याबाबत जनजागृती होते. त्यामुळे वाहनधारक स्वयंप्रेरणेने हेल्मेट वापरण्यासाठी प्रवृत्त होतात. जिल्हयातील सर्व शासकीय आस्थापना, महामंडळे, महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद येथील अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहनाने शासकीय कार्यालयात येताना, रस्त्यावर दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांना दिले आहेत.



राजे शिवछत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगरपालिका सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील, विष्णु महाराज सुरवसे इत्यादी

# ३० जून रोजी परळी पंचायत समितीसमोर बांधकाम कामगारांचे बेमुदत धरणे आंदोलन-प्रा.खाडे बी.जी.

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ जून**

परळी तालुक्यातील बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार कल्यानकारी मंडळाकडे नोंदणी व नुतणीकरणासाठी ग्रामसेवकांनी मागील वर्षी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्यावे या मागणीसाठी परळी तालुक्यातील बांधकाम कामगार ३० जूनपासून सीटू संघटनेचे प्रा खाडे यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन करणार आहेत.

इंदपवाडी, गाडे पिंपळगाव, कन्हेरवाडी धर्मापूरी, सेलू जिरेवाडी, हाळम, हेळंब, मांडवा, नागापूर, करेवाडी बोधेगांव ,मोहा, वाका, पाडोळी, हासनाबाद, वानटाकळी या गावातील ग्रामसेवकांनी बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी प्रमाणपत्र दिल्याची सुविधा केंद्रात नोंद आहे. सर्व ग्रामसेवक महाराष्ट्र सरकारचे नोकर असताना त्यांचे वेगवेगळे नियम कसे आहेत. नागापूरचा ग्रामसेवक एका कामगाराला प्रमाणपत्र देतो व बाकी कामगारांना का देत नाही याची चौकशी झाली पाहिजे. बांधकाम कामगारासाठी मंडळाने काढलेल्या बांधकाम कामगारांच्या स्वरूपा मध्ये बांधकाम मिस्त्री, वेल्डर पेंटर, प्लंबर वीटभट्टी कामगार, सुतार, –उ कामगार, डळषीं मन, फरशी कापणार, काचेचे काम करणारा कामगार हा बांधकाम कामगार आहे.त्यांना नोंदणीसाठी ग्रामीण भागात ग्रामसेवकाने प्रमाणपत्र दिले पहिजे. रोज वेगवेगळ्या मालकाकडे काम करणाऱ्या बांधकाम कामगारास ग्रामसेवकाने प्रमाणपत्र द्यावे असे सर्क्युलर पण आहे व सीओचे ही पत्र आहे. ग्रामसेवकांनी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार काम करणे अपेक्षीत आहे. काही ग्रामसेवक प्रमाणपत्र देतात किंवा साधे सही शिक्के कोणीतरी देत असावेत अशी शक्यता आहे. परळीतील नागापूर येथील ग्रामसेवक शाम गंगाधरे यानी तेथील कामगारांना नुतणीकरणासाठी प्रमाणपत्र दिले नाही म्हणून तेथील कामगार सीटू बांधकाम कामगार संघटनेच्या नेतृत्वात दि. ३० रोजी पासून धरणे आंदोलन करणार आहेत. व शहरालगत बांधकाम कामगार पंचायत समितीपुढे निदर्शने करणार आहेत. तालुक्यातील बांधकाम कामगारांनी मोठ्या संख्येने धरणे आंदोलकांना पाठिंबाव देउन निदर्शने करणासाठी ३० जून रोजी सकाळी ११ वाजता हजर रहावे असे आवाहन प्रा.खाडे बी.जी. यांनी केले आहे.

# मराठा आरक्षण: खा.सोनवणेंनी घेतली जरांगे पाटलांची भेट

## आरक्षण लढ्यासंदर्भात चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२६ जून**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी दि.१ ऑगस्टपर्यंत मागण्या मान्य करा अन्यथा दि.२९ ऑगस्टला मुंबईत आंदोलन करण्याची भूमिका घेतली असून या पार्श्वभुमीवर खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२५ जून रोजी सायंकाळी अंतरवाली सराटी येथे जावून मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षण आंदोलनावर दोघात सविस्तर चर्चाही झाली.

या प्रसंगी माजी मंत्री राजेश टोपे व माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहन जगताप हे उपस्थित होते.दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश तात्काळ लागू करावा, हैद्राबाद, सातारा व बॉम्बे गॅझेटियर लागू करून त्यावर अंमलबजावणी करावी, 'सगे-सोयरे'अधिसूचनेची तात्काळ अंमलबजावणी करावी, मराठा आरक्षणातील आंदोलकांवरील



दाखल गुन्हे मागे घ्यावेत, मराठा आंदोलनातील बलिदान दिलेल्या कुटुंबांना नोकरी व आर्थिक मदत द्यावी, न्या.शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी, संतोष अण्णा देशमुख हत्या आणि कोपर्डी प्रकरणातील आरोपींना फाशी देण्यात यावी. जर हे निर्णय १ ऑगस्ट २०२५ पर्यंत घेण्यात आले नाहीत, तर २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत मोठे आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा या पत्रात देण्यात आला आहे. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी मराठा समाजाच्या सर्व न्याय्य मागण्यांचे निवेदन योग्य त्या पातळीवर पोहोचवण्याचा प्रयत्न आपण करू, असेही यावेळी म्हटले आहे. मराठा आरक्षण लढ्यात आपण सोबत असून मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी लढत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी संपुर्ण मराठा समाज ताकतीने उभा असल्याचा विश्वासही यावेळी त्यांनी दिला.

# बाजीराव भैय्या धर्माधिकारी 'माऊली सेवा समर्पण' पुरस्काराने सन्मानित

**हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नाही, तर एक मोठी जबाबदारी आहे-बाजीराव धर्माधिकारी**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)-संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या रौप्य महोत्सवी पुण्यस्मरणानिमित्त अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'माऊली सेवा समर्पण' या प्रतिष्ठित आशिर्वादरुपी पुरस्काराने बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांना आज मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.



आषाढी वारीनिमित्त संत शिरोमणी नामदेव महाराज दिंडीचे श्रीक्षेत्र नर्सी येथून वैद्यनाथ नगरीत आगमन झाले. यावेळी पार पडलेल्या पारंपरिक 'रिंगण सोहळा' कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार स्वीकारताना बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले की, हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नाही, तर एक मोठी जबाबदारी आहे. माऊली महाराजांच्या नावाने मिळालेला हा गौरव माझ्या आयुष्यात सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा आणि दिशा देईल. पुढील काळात अधिक जोमाने समाजासाठी कार्य करेन, हे माझे अभिवचन आहे.



बीड येथील सुप्रसिध्द ऱ्हदयरोग तज्ञ डॉ.अनिल बारकुल यांच्या वाढदिवसानिमित्त तरूण भारतच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करतांना जिल्हाप्रतिनिधी जगन्नाथ देशमुख दिसत आहेत.

# पाटोदा तालुका शिवसैनिकांची जिल्हाप्रमुखानी घेतली बैठक

## पाटोदा अल्पसंख्यांक तालुका प्रमुख पदी शेख असिफ यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.२६ जून**



आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज संस्थेच्या प्रमुख निवडणूकीच्या अनुषंगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्ष बांधनीचे काम जिल्हाप्रमुख उल्हास गिराम करत आहेत. आज पाटोदा येथील शासकीय विश्रामगृहावर तालुक्यातील शिवसैनिकांची बैठक घेऊन शेख असिफ सहेबलाल यांची अल्पसंख्यांक तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली.

जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणूकी संदर्भात गट - गण निहाय चर्चा या बैठकी झाली. शिवसैनिकांनी तयारीस लागावे, पक्ष बांधनी, पक्ष संघटन यावर भर घालण्यासाठी जिल्हाप्रमुख आग्रही होते. यावेळी जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह, जिल्हा सामान्वयक संजय महाद्वार, युवा सेना जिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, शिवसेना पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, युवासेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा चोरे, युवासेना तालुका प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ लवुल, तालुका सम्वयक आकाश कांकरिया, विशाल शिंदे, अजित अडगले, योगेश शिंदे आदी शिवसैनिक मोठया प्रमाणावर या बैठकीत उपस्थित होते.

# आणीबाणी लादली तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस होय-अंबादास देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ जून**

२५ जून ज्या दिवशी भारतीयांवर आणीबाणी लादल्या गेली तो दिवस भारतीय लोकशाहीसाठी काळा दिवस म्हणून गणला जाईल असे उद्गार आणीबाणी मध्ये स्थानबद्ध झालेले डॉ. अंबादास देशमुख यांनी काढले.

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.



व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव लासूणे , मधुकरराव वट्टमवार, उर्मिला देशमुख,निर्मलाताई देशपांडे, दत्ता देशपांडे, प्राथमिक चे मुख्याध्यापक अंकुशराव मिरगुडे, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले व्यासपीठावर उपस्थित होते.

आणीबाणीला लादलेल्या दिवसाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने त्या काळात तुरुंगवास भोगलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला त्यामध्ये डॉ.अंबादास देशमुख यांना दीड वर्ष तुरुंगवास सहन करावा लागला होता. त्यामुळे विद्यालयातर्फे अंबादास देशमुख व उर्मिला देशमुख यांचा सपत्नीक तर कैलासवासी नारायणराव देशपांडे यांच्या पत्नी निर्मलाताई देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला.सत्कार प्रसंगी डॉ अंबादास देशमुख यांनी आणीबाणी ही लोकशाहीसाठी कशी धोकादायक होती? व त्या काळातली विदारक परिस्थिती विद्यार्थ्यांसमोर मांडली.आणिबाणीत मिसा खाली अटक करण्यात आलेल्या व्यक्तींचा कसा छळ करण्यात आला, किती यातना सहन केल्या याबाबत सविस्तर माहिती दिली. मधुकरराव वट्टमवार यांनी अंबादास देशमुख व कै.नारायण देशपांडे यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. अध्यक्षीय समारोपात शंकरराव लासूणे यांनी आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या त्यागी व्यक्तीमुळेच लोकशाही मजबूत झाल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता मोरे, प्रास्ताविक अनिता येलमटे यांनी केले तर आभार निलेश मांडवकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्र वैभव शिखरावर जाण्यासाठीचे, शिक्षण देणारी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था

**२८ जून १९५१ ला भारतीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली, मराठवाड्याच्या सहा जिल्ह्यात ४४ संस्कार केंद्राच्या माध्यमातून राष्ट्रीय विचारांच्या प्रवाहात अग्रेसर असणारी संस्था सामाजिक प्रबोधनाचे कार्यही करत आहे.**

हजारो विद्यार्थी दरवर्षी संस्थेतून गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबर उत्तम संस्काराने परिपूर्ण होऊन बाहेर पडत आहेत. शेकडो विद्यार्थी समाजातील विविध क्षेत्रात प्रभावीपणे काम करत आहेत. संस्थेच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या निकालाची उज्वल परंपरा निर्माण झाली आहे. दहावी बारावीच्या दैदीप्यमान निकालामुळे भाशिप्र संस्था महाराष्ट्रात अग्रस्थानावर आहे.याशिवाय शिष्यवृत्ती परीक्षा, 'एनएमएमएस' परीक्षा, नवोदय परीक्षा ,डॉ होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा ,अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये संस्थेचे विद्यार्थी चांगलेच यश मिळवत आहेत, अनेक विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारात विभाग राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. चित्रकला, संगीत, वक्तृत्व, विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी आपापल्या स्तरावर उत्कृष्ट ठरत आहेत.

पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम शिकवण्याबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात, त्याचबरोबर शरीर आणि बुद्धी यांच्या विकासासाठी पंचकोश विकासाच्या



अंगाने पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत म्हणूनच विद्यार्थ्यांच्या आनंदमय कोशाचा विकास होऊन शाळा सोडताना विद्यार्थ्यांना शाळेची प्रदीर्घ आठवण होत राहते .

राष्ट्र प्रेमाने ओतप्रोत भरून निघणारा तरुण असेल तर राष्ट्र वैभव शिखरावर पोहोचते, या श्रद्धेने ,विचाराने 'भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेची' उभारणी झालेली आहे. आपल्या विश्व श्रेष्ठ असलेल्या भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान व संवर्धन करून भारत मातेला परमवैभवाप्रत नेण्याचे कार्य शिक्षणातून साधावयाची आहे. आपल्या संस्कृतीचे आकलन होण्यासाठी संस्कृतचे अध्ययन, योगासनाचे शिक्षण, देशभक्तीपर गीतांचे पाठांतर, संगीत शिक्षण व शारीरिक शिक्षण यांच्या द्वारे भारतीयत्वाचे शिक्षण देण्याची कार्य संस्था प्रारंभ पासूनच करीत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत संस्थेने गुणवत्तेचे नवीन मापदंड निर्माण केला आहे. २२ विद्यार्थी १००% गुण मिळवून आणि ६०४ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून राज्यात सर्वोच्च स्थानी संस्था पोहोचली.

शिक्षण क्षेत्रात प्रत्येकाने नाविन्यपूर्ण नैपुण्य प्राप्त करण्यासाठी कटिबद्ध होण्याचा संकल्प करून तो सिद्धीस नेण्यासाठी कार्य योजना केली जाते, स्वदेश, स्वभाषा, पर्यावरण ,समरसता व नागरी शिष्टाचार आणि कुटुंब प्रबोधन या विषयात संस्था काम आहे,भारत मातेच्या परम वैभवासाठी प्रत्येक हात कामाला लावूया हा उद्देश आणि कार्य गेली ७४ वर्षापासून सुरू आहे ,क्षेत्र कुठेही रिक्त राहिले हे आता होणे नाही...




या काव्यपंक्तीप्रमाणे येणाऱ्या शैक्षणिक वर्षात सर्व क्षेत्रात गगन भरारी घेण्यासाठी सर्वांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या आणि संकल्प कार्यसिद्धीसाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर आणि कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी आज २८ जून संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्धापन दिनाच्या निमित्ताने शुभेच्छासह संकल्प दिला आहे.

■
**निमित्त अमृतमहोत्सवाचे**
**प्रमोद कुलकर्णी,बीड(९४०३९०४६५१)**